आणि मग 'तिकडून' फोन धाडकन् बंद केला जातो.

—टेलिफोन डिरेक्टरी, पुणे




# माणूस

शनिवार १० ऑक्टोबर १९७०
चालीस पैसे

शनिवार १० ऑक्टोबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : पंचविसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

माणूसचा २६ सप्टेंबर १९७० चा अंक नेहमीप्रमाणे 'टॉप' आहे. पण 'मुंबई वार्ता' लिहिताना श्री. अरुण गोसावी यांनी एक चूक केलेली आहे.
परळच्या पोट निवडणुकीबद्दल लिहिताना ते म्हणतात की, 'जनसंघही ही निवडणूक लढवणार आहे.' पण माझ्या माहितीप्रमाणे हा सामना फक्त उजवे कम्युनिस्ट व शिवसेना यांमध्येच होणार आहे व जनसंघाचा ही निवडणूक लढवण्याचा पहिल्यापासूनच विचार नव्हता. कारण 'राष्ट्रद्रोही कम्युनिस्टांचा पराभव व्हावा म्हणून जनसंघ ही निवडणूक लढवणार नाही' असे पत्रक मुंबई जनसंघाच्या अध्यक्षांनी काढले आहे. तेव्हा अरुण गोसावी यांनी वरील विधान कोणत्या आधारावर केले?

२५ सप्टेंबर, १९७० — प्रफुल्लदत्त न. तांबेकर, कुळगाव

आपला दिनांक ३० सप्टेंबर १९७० चा अंक फार आवडला. विशेषत: श्री. किरण ठाकूर ह्यांचा 'मध्यपूर्वेतील हवाई दहशतवाद' हा लेख अतिशय आवडला. श्री. विजय वैद्य ह्यांचा 'गेल्या मार्चमध्ये मी केरळच्या दौऱ्यावर होतो' हा लेख अपुरा वाटला.

३० सप्टेंबर, १९७० — भास्कर जोशी, वसमतनगर.

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# टेलिफोन डिरेक्टरी, पुणे


**अ. अं. कुलकर्णी**

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

दूरध्वनी : ५६९८२


डिरेक्टरी एन्ट्रीज 'चा फोन नंबर 55281/27 मी फिरविला.

तिकडून साद आला... 'डिरेक्टरी एन्ट्रीज हिअर...'

'साहेब, जरा बोलायचंय्,' मी म्हणालो.

'बोला!'

'या महिन्यात मिळालेली नवी टेलिफोन डिरेक्टरी अशी का?'

'अशी म्हणजे कशी?'

'चांगली छापलेली नाही. शिवाय त्यात काही चुका आढळल्या.'

'चुका?'

'हो. शिक्षण संचालक श्री. धोंगडे निवृत्त होऊन दोन वर्षे होऊन गेलेली आहेत, पण डिरेक्टरीत D. E. चे नाव अजून श्री. धोंगडेच आहे. डे. डायरेक्टर श्री. उपासनी यांच्या घरचा फोन नंबर काही महिन्यांपूर्वीच बदलला आहे पण डिरेक्टरीत अजून जुनाच आहे. हे असे कसे?'

'त्याला आम्ही काय करणार? ही नावे बदलण्याची जबाबदारी टेलिफोन खात्याची नाही. ज्यांनी त्यांनी आपापली काळजी घेऊन नंबर्स व नावे वगैरे बदलून घ्यावयाची असतात. शिक्षण खात्याने ती अजून जुनीच का ठेवली, हे तुम्ही हवे तर शिक्षण खात्याला विचारा. ते जोपर्यंत सहस्रबुद्धेसाहेबांचे नाव कळवीत नाहीत तोपर्यंत डिरेक्टरीत धोंगडेच राहणार; त्याला इलाज नाही.'

'पण मोठमोठ्या सरकारी ऑफिसर्सच्या नावा-नंबर्सची दखल टेलिफोन खात्याने वेळीच घ्यावयास हरकत नाही असे मला वाटते.'

'मला तसे वाटत नाही. ते काम आमच्या खात्याचे नाही. त्या त्या खात्याने ते करावे. तुम्ही हवे तर शिक्षण खात्याला तसे सांगा.'

'उद्या मेयर, कमिशनर, मिनिस्टर वगैरे बदलले तर डिरेक्टरीत तरी जुन्यांचीच नावे राहणार काय?'

'होय. नव्या येणाऱ्या मेयरने किंवा कार्पोरेशनने ती काळजी घ्यावी.'

'तुमच्या खात्यात किंवा डिरेक्टरीसंबंधात काही नावा-नंबर्सचे फेरबदल झाले तर? तुमचे धोरण त्यांच्या सूचनेचीच वाट पाहणार काय? की तुमचे ऑफीस हे फेरबदल आपण होऊन करणार?'

'त्या बाबतीत आम्हास लक्ष देता येईल...द्यावे लागेलच असे नाही.'

'बरं, उपासनींच्या बाबतीत?'

'त्या बाबतीत म्हणाल तर फेब्रुवारी ७० पर्यंतच्या करेक्शन्स् या डिरेक्टरीमध्ये आम्ही घेतलेल्या आहेत. नंतरच्या करेक्शन्स-बदल या डिरेक्टरीत येऊ शकलेल्या नाहीत... शकणारच नाहीत. उपासनींचा नंबर फेब्रुवारी १९७० नंतर बदलला गेला असणार. म्हणूनच तो जुनाच छापला गेला आहे...

'अशा वेळी फोन दुसरीकडे जाऊन फोन करणाराचे काही आर्थिक नुकसान वगैरे झाले तर...?'


'तसे काही फारसे होत नसते, पण झाले तर त्याला आमचा इलाज नाही.'

'मग एकदा हे वर्तमानपत्रात लिहावे लागेल.'

'लिहा की!'

आणि मग तिकडून फोन धाडकन् बंद केला जातो.






**परळ निवडणूक । मुंबई**

**विजय वैद्य**

परळ–लालबाग मतदार संघाच्या खूप मोठ्या भागातून मी पदयात्रा केली त्यावेळी मला असं आढळलं की प्रचारात शिवसेनेनें निश्चितच आघाडी मारली आहे. काळा चौकी ते परळ नाका एवढ्या भागात (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग) सर्वत्र शिवसेनेच्या भगव्या ध्वजांनी खास वातावरण निर्माण केलं आहे. चाळीचाळीतून व इमारतींच्या गच्च्या, छपरे, टाक्या, कौलांवर हे छोटे मोठे भगवे ध्वज फडफडताना दिसतात. याच रस्त्यावरील महानगरपालिकेच्या दिव्यांच्या खांबावरही असे ध्वज दिसतात.

परळ विभागामध्ये भगव्या ध्वजांचं प्रमाण अधिक आहे–त्या भागात जाताच तेथे उत्सवाचं आणि शिवसैनिकांच्या उत्साहाचं वातारण सहज नजरेस येतं.

डॉ. एस्. एस्. राव मार्ग व या मतदार संघातील आतील भाग, गल्ल्याबोळांतही असे ध्वज आढळतात, पण मध्येच एखादी तुरळक इमारत आपल्या नजरेत येते की ज्या इमारतीवर साम्यवाद्यांच्या विळाकोयत्याचे लाल ध्वज दिसतात, पण ते भगव्या ध्वजात 'घेरावो' झाल्याप्रमाणे भासतात.

एक दोन ठिकाणी गल्लीबोळात शिवसेनेचे भगवे ध्वज व साम्यवाद्यांचे लाल ध्वज एकाच खांबावर असल्याचं मजेदार दृश्यही नजरेस पडतं.

भितींवर रंगवलेल्या घोषणा व घोषणांचा समरप्रसंग लाजबाब आहे. आंबेडकर मार्गावरील भिंतींपेक्षा डॉ. राव मार्ग व इतर आतील भागातील भिंती अधिक



प्रमाणात रंगल्याचं आढळतं, किंबहुना एकाही इमारतीच्या वा कम्पाऊंडच्या भितीचा छोटासा कोपराही या युद्धातून सुटलेला नाही. अर्थातच येथेही शिवसेनेने साम्यवाद्यांवर कुरघोडी केल्याचं आढळतं. त्यांना भिती रंगवायला शिवसेनेने फारच कमी स्कोप ठेवला असावा असं दिसतंय्. मात्र सुपारी बाग आणि महात्मा गांधी स्मारक रुग्णालयासमोरील काही भितींवर साम्यवाद्यांच्या लाल रंगातील घोषणा शिवसेनेपेक्षा संख्येने अधिक असल्याचं दिसतं.

गल्लीगल्लीत प्रचारसभांचे फलक लागल्याचं दिसतं. शिवसेनेचे वक्ते नेहमीच्याच संचातील असतात—यांना शिवसेना बिग गन्स म्हणते—प्रमोद नवलकर, दत्ताजी साळवी, प्रि. मनोहर जोशी व काही वेळा स्वत: शिवसेना प्रमुख श्री. ठाकरे.

साम्यवादी पक्षाच्या फलकावर वक्त्या भाई-मंडळींबरोबर त्यांच्या उमेदवाराला पाठिंबा देणाऱ्या इतर पक्षांच्या उमेदवारांची नावं असतात. यातील एक गंमतीदार प्रकार असा की ६८ सालच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी प्रा. मधु दंडवते हे नाव शिवसेनेच्या फलकावर असे. यावेळी एका फलकावर प्रा. मधु दंडवते हे यांचं नाव, कॉ. अहिल्या रांगणेकर, कॉ. गणाचार्य, कॉ. विनायक भावे यांच्या कोंडाळ्यात आढळले. त्या सभेत बोलणारे साम्यवादी नसलेले ते एकमेव वक्ते होते.

## घोषणा

शिवसेनेने नाविन्यपूर्ण व अत्यंत आकर्षक अशा घोषणा रंगविण्यात कौतुकास्पद कल्पकता दाखविली आहे. तर दोनचार घोषणा सोडता साम्यवाद्यांच्या इतर सर्वच घोषणा जुनाट, साचेबंद आहेत. पुढील घोषणाच याची साक्ष देतील.

शिवसेनेच्या काही घोषणा—

लालबाग लालबाग, लालभाईंची भागंभाग.
तिलांजली फाटाफुटी, मतांजली वामनरावांसाठी.
मेरा नाम जोकर कम्युनिस्टांना मारू ठोकर.
प्रिती परी तुजवरती, भगवा झेंडा ने वरती.
शूर आम्ही सरदार आम्हांला काय कुणाची भिती,
निवडून देणे शिवसेनेला हीच मराठी जनांची नीती.
राष्ट्रद्रोही कम्युनिस्टांना नको थारा, शिवसेनेला विजयी करा.

म्हणतो गरीबीचा बापू, लाल-
भाईंचे नाक कापू.
नवऱ्याची कमाल, बायकोची
धमाल, दोघांची मते शिवसेनेला
बहाल.
हे नव्हे केरळ. हे आहे परळ,
करू तुम्हांला सरळ.
मराठी माणूस आहे सच्चा,
नाही कुणाचा बगलबच्चा.
लालभाई करतो शेरशायरी आता
उतरणार लालबागची पायरी.




घरात फुलला पारिजात, शिवसेनेला मते एकजात.
वाहतो ही मतांची जुडी, शिवसेनेची विधानसभेवर उडी.
काळे बेट, लाल बत्ती, लालभाईंची उतरवा मस्ती.
आले देशद्रोही लक्ष जरी, शिवसेने, प्रीती परी तुजवरी.
लाल तो लाल, मास्कोचा दलाल.
यात एक खटकणारी घोषणा आहे ती अशी—
"अग अग म्हशी तू निवडून कशी येशी ?"

काही साम्यवादी घोषणा—
परळ—परळ होईलच केरळ.
लाल तो लाल, दलाल तो दलाल.
क्षण एक पुरे सरोजिनीच्या विजयाचा, मग वर्षाव पडो मरणांचा.
बाई नि बाटली तुमचा धंदा, का करता आमची निंदा.
तेरा भाई, मेरा भाई, सबका भाई सी. पी. आय्.
जो डुबे इन गिलासोमे न उभरे जिन्दगीमे,
हजारो शिवसैनिक डुब गये इन बंद बाटलीके पानीमे।
चम चम चम के हसिया पियारी झोमे डाली धानकी
जय हो इस निशान की, जय मजदूर किसान की।

त्यांच्या बाकीच्या सर्वच घोषणा 'कॉ. कृष्णा देसाई अमर रहे', 'कॉ. सरोजिनी देसाईंना मते द्या' अशा अगदीच साचेबंद आहेत.

हे नव्हे केरळ, हे आहे परळ. परळ—परळ, होईलच केरळ ?

गेले अनेक महिने सर्वत्र एका विषयावर तर्कवितर्क चालू आहेत. विषय अर्थातच मुदत-पूर्व निवडणुका होणार काय ? असा आहे. या संदर्भात उलटसुलट बातम्या सारख्या येत असतात, पण तरीही इंदिराबाईंच्या मनाचा थांगपत्ता अजूनही

लागत नाही. परवाची एक नवकाँग्रेस गोटातील बातमी निवडणुका ७१ सालीच होणार असल्याचं म्हणते. काही दिवसांपूर्वी सर्वांचं लक्ष केरळच्या निवडणुकांवर लागलं होतं.

आज महाराष्ट्राचं आणि विशेषत: मुंबईचं लक्ष लागलं आहे ते १८ ऑक्टोबर या तारखेकडे. त्या दिवशी उत्तर-मध्य मुंबईत एक अटीतटीची निवडणूक होणार आहे. मतदारसंघ आहे लालबाग-परळ. गेल्या ५ जून रोजी त्या मतदार संघातील आमदार कृष्णा देसाई यांचा खून झाला आणि मुंबईत अत्यंत खळबळ माजली. त्यांच्या खुनाने रिकाम्या झालेल्या जागेसाठी ही निवडणूक होणार असून या सरळ सामन्यात शिवसेनेचे श्री. वामनराव महाडीक आणि साम्यवादी पक्षाच्या श्रीमती सरोजिनी कृष्णा देसाई हे दोन उमेदवार उभे आहेत. एकूण ८७ हजार मतदार यापैकी एका उमेदवाराला आपला प्रतिनिधी म्हणून विधानसभेत पाठविणार आहेत. या ८७ हजार मतदारांत सुमारे ११ हजार मतदार नवे आहेत. यातील बहुसंख्य मंडळी तरुण असून मोठ्या प्रमाणात शिवसेनेच्या मागे आहेत. धडाडीनं, उत्साहानं प्रचाराचं काम करीत आहेत. शिवाय ६८ साली महानगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकात, विधानसभेच्या या मतदार संघात पालिकेचे एकूण पाच मतदारसंघ होते आणि त्यापैकी चार मतदार संघांतून शिवसेनेचे उमेदवार निवडून आले; तर वार्ड क्र. ६४ मधून शिवसेनेचा पाठिंबा असलेला प्र. स. पक्षाचा उमेदवार निवडून आला. याचा अर्थ ६८ साली या भागात इतर पक्षांची आणि विशेषत: साम्यवाद्यांची पीछेहाट झाली. ही मंडळी पूर्वी गिरणगावातील कामगारात चांगलेच पाय रोवून बसली होती. हा भाग पूर्वी त्यांचा बालेकिल्ला होता. आज मात्र हा बालेकिल्ला शिवसेनेच्या हातात असल्याचं दिसतं – फारच पीछेहाट झाली त्यामुळे या निवडणुकीद्वारे गिरणगावातील आपलं पूर्वीचं स्थान परत मिळविण्याचा साम्यवाद्यांचा प्रयत्न चालू आहे, तर शिवसेनेला तेथील स्थान टिकवायचं आहे. इतर पक्ष तेथे निवडणूक लढवित नाहीत त्याची इतर कारणं आहेत; पण त्यातील महत्त्वाचं कारण हे आहे की शिवसेना, साम्यवादी व काही प्रमाणात प्र. स. पक्ष सोडल्यास इतर पक्षांचा त्या भागात विशेष असा जोरच नाही. ६७ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत या मतदार संघातून कृष्णा देसाई २८ हजारांवर मतांनी निवडून आले. त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी होते एकसंध काँग्रेसचे. बॅ. माने. बॅ. माने यांना सुमारे १८ हजार मते मिळाली तर प्र. स. पक्षाचे श्री. विचारे यांना ८ हजारांवर मते पडली. जनसंघ आणि एक अपक्ष उमेदवार यांची डिपॉझिटस् गेली. पण ६८ साल म्हणजे ६७ साल नव्हते. शिवसेनेची घोडदौड चालू झाली होती आणि महानगरपालिका निवडणुकीच्या वेळी डाव्या-उजव्या पक्षांना मुंबईत अनेक ठिकाणी उतरती कळा लागली होती. पण आज ७० सालची परिस्थितीही बदललेली आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे एक कार्यकर्ते श्री. सुधाकर लोणे यांनी त्यांच्या अनेक अनु-

यायांसह समारंभपूर्वक (नव) कॉंग्रेस प्रवेश केला. त्यानंतर शिवसेनेचे दुसरे एक कार्यकर्ते श्री. पावसकर हेही लालबागमधील त्यांच्या अनुयायांसह (नव) कॉंग्रेस प्रवेश करणार असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. शिवाय कृष्णा देसाई यांच्या खुनामुळे एक भावनात्मक पार्श्वभूमी तयार झालेली आहे. अशा या पार्श्वभूमीवर कोण ही निवडणूक जिंकणार याबाबत सर्वत्रच उत्सुकता दिसून येते.

एका बाजूला शिवसेना असून दुसऱ्या बाजूला सर्व डावे पक्ष प्रथम एक झाल्याचं दृश्य आज दिसतं आहे. पण सुरुवातीची परिस्थिती अशी होती की या डाव्या पक्षांचा साम्यवादी पक्षाला मनापासून पाठिंबा असावा असं दिसत नव्हतं. २५ सप्टें० रोजी श्रीमती देसाईंना पाठिंबा देणाऱ्या सर्व पक्षांची सभा साम्यवादी पक्षाच्या दळवी बिल्डिंग येथील कचेरीत झाली. त्या बैठकीला प्र. स. पक्ष व सं. स. पक्षाचे प्रतिनिधी हजर नव्हते, पण या सर्व पक्षांनी एकमतानं पाठिंबा द्यायचं ठरविलं ' हा लोकशाहीचा विजय आहे ' असं प्रतिपादन त्या पक्षाच्या प्रवक्त्यांनी केलं. ठोकशाहीची भाषा बोलणारा साम्यवादी पक्ष आज लोकशाहीची भाषा करू लागला आहे. (जय लोकशाही) नवकॉंग्रेसनेही या आघाडीला पाठिंबा व्यक्त केलेला आहे. सोशालिस्ट फोरमवाले कॉंग्रेस कार्यकर्ते ' आपला पाठिंबा श्रीमती देसाईंनाच पाहिजे ' असं प्रथमपासूनच ठामपणं म्हणत आहेत.

संयुक्त समाजवादी पक्षाला असं वाटतं की ज्या पद्धतीनं कृष्णा देसाई यांचा खून झाला ती एक अत्यंत अनिष्ट पद्धत असून अशा वेळी शिवसेनेनं ती जागा लढविणंही राजकीय दृष्टीनं पहाता अनिष्ट प्रवृत्ती आहे. ती जागा साम्यवादी पक्षाची आहे. शिवाय ६७ सालापासून किमान कार्यक्रमावर विरोधी पक्षांनी एकत्र येण्याची जी एक प्रथा पडली आहे. त्याचा विचार करता श्रीमती सरोजिनी देसाई यांनाच त्यांच्या (सं. स.) पक्षाने पाठिंबा देणं योग्य, शिवाय शिवसेनेच्या विचारांशी तो पक्ष कधीच सहमत नव्हता हे त्यामागील दुसरं कारण. आणि म्हणूनच जिथे जिथे शक्य होईल तिथे सं. समाजवादी, साम्यवाद्यांना सक्रिय सहाय्य करणार आहेत. शे. का., लालनिशाण, रिपब्लिकन, मार्क्सवादी साम्यवादी व प्र. स. पक्ष हे पक्ष अशाच काही कारणांसाठी श्रीमती देसाईंना पाठिंबा देत आहेत. या सर्व पक्षांमध्ये आज मुंबईत हास्यास्पद ठरलेला कोणता पक्ष असेल तर तो प्रजा समाजवादी पक्ष. साम्यवाद्यांशी संबंध नको म्हणून ही मंडळी समितीमधून फुटली, एवढंच नव्हे तर महानगरपालिकेच्या निवडणुकीत या पक्षानं शिवसेनेशी युती केली होती. आणि आज हाच पक्ष शिवसेनेला विरोध करण्याकरिता, त्यांनीच देशद्रोहाचा शिक्का मारलेल्या साम्यवाद्यांच्या मांडीला मांडी लावून बसत आहे. या संदर्भात एका सुशिक्षित मतदारानं माझ्याशी बोलतांना पुढील मजेदार उद्गार काढले. ' मला वाटतं आपलं अस्तित्व टिकविण्याकरिता हा पक्ष ' मेरी-गो-राऊंड 'च्या त्या हत्ती-

पृष्ठ ५३ वर

सु. ल. सोमण

# मागील अंकावरून पुढे

पॅरिस येथे विएतनाम प्रश्नांवरील वाटाघाटींची ८४ वी फेरी नुकतीच संपली. ह्या वाटाघाटींचा बराच गाजावाजा सध्या चालू आहे. द. विएतनामच्या क्रांतिकारी सरकारच्या परराष्ट्रमंत्री मादाम बिन्ह् यांनी अत्यंत विधायक सूचना करूनही ह्या वाटाघाटी फिसकटल्या त्या सायगाव सरकारच्या ('की' सरकार) व अमेरिकेच्या आडमुठेपणामुळे असाही प्रचार अर्थातच, लाल जगात झाला. परंतु अमेरिकन प्रतिनिधी श्री. डेव्हिड ब्रुस ह्यांच्या मते मादाम बिन्ह् ह्यांच्या सूचना म्हणजे, 'नव्या बाटलीतील जुनी दारू !' अशाच स्वरूपाच्या होत्या. ('नव्या बाटलीतील जुनी दारू !' हे अमेरिकन प्रवक्त्याचं स्पष्टीकरण. ब्रुससाहेब, दारूचा संबंध आला म्हणून की काय, पण पहिल्यांदा 'जुन्या बाटलीतील नवी दारू' असंच म्हणून गेले ! मादाम बिन्ह् ह्यांनी वार्ताहरांना सांगितलेल्या एका वाक्याचंही असंच लगोलग स्पष्टीकरण विएतकाँग प्रवक्त्यानं केलं. जून १९७१ पर्यंत अमेरिकन व इतर सर्व परकीय फौजांनी विएतनाममधून बाहेर पडायचं जाहीर करावं; आणि तसं जाहीर होताच, विएतकाँग, कम्युनिस्टस् शस्त्रसंधी करतील ही मादाम बिन्ह् ह्यांच्या आठ सूचनांपैकी एक सूचना ! ह्यावर भाष्य करताना विएतकाँग प्रवक्त्यानं स्पष्ट केलं की 'दक्षिण विएतनामी फौजांनी जर का अमेरिकन फौजांची जागा घेतली तर त्यांच्याविरुद्ध कम्युनिस्टांना लढा चालूच ठेवावा लागेल. आणि हा लढा दीर्घकाळ चालू राहील.'

अर्थात गेले सोळा महिने चालू असलेल्या ह्या वाटाघाटींवर तोडगा काही ह्या गाजलेल्या ८४ व्या फेरीनं शोधला नाही. मादाम बिन्ह् ह्यांनी केलेल्या सूचनांवरून एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली आहे. अमेरिकेनं सैन्य 'ताबडतोब' बाहेर काढून घ्यावीत हा हेका विएतकाँगने सोडला आहे. त्याऐवजी ३० जून १९७१ ची मर्यादा घालून घ्यायची अमेरिकेनं तयारी दर्शविल्यास शस्त्रसंधीची तयारी दर्शविली आहे; अमेरिकन राजबंद्यांची मुक्तता करण्याची तयारी व्यक्तविली आहे. विएतकाँगच्या भूमिकेतला हा फरक, खुद्द अमेरिकेतही स्वागतार्ह मानला गेला आहे. नोव्हेंबरमधल्या अमेरिकेतल्या निवडणुका, अमेरिकन राजबंद्यांना मिळणाऱ्या वाईट वागणुकीचा विचार करण्यासाठी भरणारी वॉशिंग्टनमधील काँग्रेस ह्यांच्या सुमारासच

ही राजकीय घोषणा पॅरिसमधून झालेली असली तरी, ती बरच नवीन खाद्य पुरविल ह्यात शंका नाही.

द. विएतनामचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंतप्रधान ह्या प्रमुख त्रयीला वगळून नवीन ‘कामचलाऊ’ राष्ट्रीय सरकार तिथे अस्तित्वात यावं व मग त्या शासनानं नव्या निवडणुका घेऊन, खरंखुरं प्रातिनिधीक सरकार स्थापावं असं मादाम बिन्ह सुचवतात. सायगाव शासनाच्या प्रतिनिधींनी ह्या सूचना फेटाळाव्यात (आणि अमेरिकेनंही !) ह्यात आश्चर्य असं काहीच नाही. अर्थातच, वाटाघाटीचा घोळ असाच पुढेही चालू राहणार हे ओघानंच आलं...

## कंबोडियाचे भवितव्य ? ?

सहा महिन्यापूर्वी कर्नल लॉन नॉल ह्यांनी परदेश दौऱ्यावर असलेल्या राजे सिहानौक ह्यांना पदच्युत करुन कंबोडियात सत्ता हस्तगत केली. तेव्हापासून आतापर्यंत तिथे राजे सिहानौक ह्यांचे समर्थक, त्यांचे कम्युनिस्ट सहकारी व नॉल शासनाच्या फौजा ह्यांच्यात चकमकी झडत आहेत. जवळजवळ निम्मा कंबोडिया कम्युनिस्ट अधिपत्याखाली आला आहे. उरलेल्यात चकमकी चालू आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, थायलँड, उत्तर विएतनाम, उ. कोरिया, लाल चीन वगैरे राष्ट्रंही प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या ह्या लढयात उतरलेली आहेत. व एरवी शांतताप्रिय अशा ह्या ख्मेर जनतेला आज बिकट अवस्थेतून जावं लागत आहे. ह्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान लॉन नॉल व राजे नारदोम सिहानौक ह्यांनी आपापले विचार अगदी अलीकडेच प्रदर्शित केले आहेत.

नॉम पेन्ह ह्या कंबोडियाच्या राजधानीत पत्रकारांशी बातचित करताना ज. नॉल म्हणाले, ‘...कंबोडियातल्या लढयाबद्दल अमेरिकेला जबाबदार धरणं चुकीचं आहे. किंबहुना अमेरिकेनं कंबोडियात हस्तक्षेप करण्याच्या फार फार अगोदर कम्युनिस्टांनी युद्धक्षेत्र वाढवलं होतं; नि आमच्यावर हल्ले सुरू केले होते...देशभर धांगडधिंगा घालायला कम्युनिस्टांना आम्ही मुळीच वाव देणार नाही ... आम्ही त्यांना पूर्णपणे ठेचून काढू...अमेरिकन सैन्ये कंबोडियात परतावीत असं मला मुळीच वाटत नाही. वेळ पडलीच तर त्यांचं साहाय्य घ्यावं लागेलही. पण तूर्त तरी कंबोडियाला प्रचंड शस्त्र साहाय्य हवं आहे. चार कोटी डॉलर्सची शस्त्र–मदत सध्या मंजूर झाली आहे, तर आमची आवश्यकता दुपटीहून अधिक आहे. दोन लाखाचं खडं सैन्य आम्हाला १९७१ पर्यंत उभं केलंच पाहिजे...’ कम्युनिस्टांचा संपूर्ण पाडाव हाच एकमेव पर्याय असल्याचं ज. नॉल ह्यांना मन:पूर्वक वाटतं आणि त्या दृष्टीनं त्यांनी पावलंही टाकायला सुरुवात केली आहे.

ह्याच्या बरोबर विरुद्ध भूमिका राजे सिहनौक ह्यांनी घेतली आहे. एका अमेरिकन मासिकातून लिहिलेल्या लेखात त्यांनी अमेरिकेवर तुफानी हल्ला चढवला आहे.

'कम्युनिझमला विरोध करण्याची अमेरिकन विचारसरणी समजण्यासारखी असली तरी, नॉल किंवा की-सरकारसारख्या जनताविरोधी सरकारांच्या संरक्षणार्थ अमेरिकेनं चालवलेली धडपड निरर्थक वाटते... अलिप्तता धोरणाचा स्वीकार हाच लाओस आणि कंबोडिया प्रश्नावरील सर्वोत्तम उपाय आहे. परंतु जसजसे अमेरिका व तिचे सहकारी ह्या प्रदेशात खोल खोल शिरू पाहतील, तसतसे ते ह्या राष्ट्रांना 'अलिप्त' धोरण स्वीकारण्यापासून दूर लोटतील. राष्ट्रीय आघाडीला विरोध करीत राहण्याच्या धोरणामुळे अप्रिय असं नॉल सरकार काही काळ तग धरील. पण त्याचबरोबर कंबोडियन जनता व तिथलं शासन आशियाई लाल कळपात ओढलं जाईल हेही अमेरिकेनं विसरू नये...'

## युनोचं रौप्यमहोत्सवी वर्ष

जॉर्डनमधली यादवी, मध्यपूर्वेतली तंगी, हवाई चाचेगिरी, विएतनाम, कंबोडियातले लोंबकळते प्रश्न... जागतिक अशांततेच्या अशा वातावरणात 'युनो' २५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यासाठी रौप्यमहोत्सवी अधिवेशन १४ ते २४ ऑक्टोबरपर्यंत भरत आहे. देशोदेशींचे प्रमुख ह्या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. हा रौप्यमहोत्सवाचा सोहळा सुरू होत असताना, 'युनो' आमसभेचे नवीन अध्यक्ष, नार्वेचे एडवर्ड हाम्ब्रो आणि 'युनो'चे जनरल सेक्रेटरी ऊ थांट ह्यांनी व्यक्त केलेले विचार मात्र निराशाजनक आहेत. आमसभेपुढे अध्यक्षाच्या नात्यानं केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणात हाम्ब्रो ह्यांनी वरील समस्यांना स्पर्शही न करता सामाजिक परिस्थिती व वातावरणाच्या दूषितीकरणाच्या प्रश्नांवर भर दिला. वर दिलेल्या राजकीय प्रश्नांमध्ये मध्यस्थी करून समझोता घडवून आणणं, मतभेद मिटवणं व निर्णय देणं हे जरी 'यूनो'चं खरंखुरं अभिप्रेत कार्यक्षेत्र असलं, तरी ते 'यूनो'च्या शक्तिबाहेरचं आहे ह्याची जाणीवच त्यांच्या भाषणातनं आढळली. ऊ थांट ह्यांनी तर हा मुद्दा अधिकच स्पष्ट केला. ते म्हणतात, '... गेल्या २५ वर्षांतली अस्थिर का होईना, पण अणुयुद्ध टाळणारी शांतता, कोट्यावधी जनतेला चाखायला मिळालेलं स्वातंत्र्याचं वारं, यूनोनं पार पाडलेले शैक्षणिक व आरोग्य आघाडीवरील कार्यक्रम वगैरे पाहिलं की यूनोच्या कामगिरीबद्दल समाधान वाटतं... पण त्याचवेळी मध्य आशिया, इंडोचीन वगैरे प्रश्न, बहुसंख्य सभासद राष्ट्रांनी तुंबवलेली वर्गणी, 'यूनो'ला असलेलं कर्ज वगैरे पाहिलं की मन निराश होऊन उठतं... सर्व राष्ट्रांनी, विशेषतः 'बड्यां'नी, उदार दृष्टिकोन स्वीकारून जर भरीव सहकार्य दिलं तर, वास्तविक 'यूनो' फार चांगलं कार्य करू शकेल, ह्यात मला तरी शंका नाही... परंतु सध्या तरी 'यूनो'चं व्यासपीठ स्वतःच्या विचारांच्या प्रचारासाठी, सामर्थ्य प्रदर्शनासाठी वापरलं जातं... नि असं आहे तोंवर 'यूनो' निष्प्रभच राहणार...' ◻ ◻ ◻

# कात्रणे । कातरणे

## आईवरुनी कोणी–अपशब्द चार वदले !

¤ आज × × महापालिकेच्या सभागृहात इंदिरा काँग्रेसचे × × × यांनी विरोधी गटाचे × × × यांना आईवरून शिवी दिल्याकारणाने सभागृहातील वातावरण तप्त झाले. सभा हमरीतुमरीवर येऊन गोंधळात बरखास्त झाली.

¤ आज × × × सभागृहात आले व × × यांचेपाशी एकाच कोचावर जाऊन बसले. दोघेही हसत खेळत गप्पा मारू लागलेले पाहून सर्व सभासद चकित झाले.

मंडळी, आम्हीदेखील चकित झालो. आई हा सानेगुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांप्रमाणे, आमचाही विक पॉइंट आहे. सानेगुरुजींना काय बरे वाटले असेल ? ते सांगून सांगून दमले होते– 'माता हा भारतीय स्त्रियांचा अपार महिमा. त्या संभाळणाऱ्या आहेत. मुले संभाळतील. पती संभाळतील. ध्येये संभाळतील. माता करील प्रेम. माता करील सेवा. ती देईल आशीर्वाद !' रामच्या आईने रामला संभाळले. श्यामच्या आईने श्यामला संभाळले. अहमदच्या आईने अहमदला संभाळले. पेस्तनजीच्या आईने पेस्तनजीला संभाळले. माझ्या आईने मला संभाळले. तुमच्या आईने तुम्हाला संभाळले. संभाळले की नाही ? माता हा काही फक्त भारतीय स्त्रियांचा अपार महिमा नाही. ज्यू पुराण वाचा– 'God could not be everywhere and therefore he made mothers.' माता हे देवाचं रूप आहे. बायबल वाचलत का ? 'Her children arise & call her blessed–' मेरी ही तर कुमारी माता होती ! काहीच वाचलं नसलं तर कवी यशवंतांचं काव्यगायन तरी ऐकलं असेल–'आई म्हणोनि कोणी – आईस हाक मारी !' आम्ही ही कविता ऐकताना कवीसह दोनदा रडलेलो आहोत. आमचा पिंड हा असा असल्याने, श्री. × × यांनी × × यांच्याबरोबर चार दिवसात हसत खिदळत गप्पा माराव्या, हे पाहून आम्हाला धक्काच बसला. श्री. × × यांनी × × यांना शांत तरी कसे केले, हा आम्हाला प्रश्न होता. नंतर आम्हाला जेव्हा या प्रकरणातला समग्र वृत्तांत कळला तेव्हा आम्ही भानावर आलो. श्री. × × श्री. × × यांना म्हणाले–

'आईचं काय एव्हढं मनावर घेता राव ? आपली भारतमाता आपली सर्वांची आई है का न्हाई ? आता आईचं कुणी बोडकीसारखं, नाही तर विद्रूप चित्र काढलं, म्हणजे ती आईवरून शिवीच झाली का न्हाई ? मी म्हणतो शिवीपेक्षा वाईट...!'

यात नाकारण्यासारखे काय होते ? श्री. × × शांतपणे ऐकत होते–

'आता रशियाने भारतमातेचे बोडकीसारखे चित्र छापले. आपल्याला दिली की न्हाई आईवरून शिवी ? पण ते काय मनावर घ्यायचं का काय ? आपले राष्ट्रपती तिकडं गेल्यात. गिरीसाहेब तेंच्या राष्ट्रपतीसंगं एका कोचावर बसून खात्यात

पित्यात...गप्पा करत्यात. आईचं काय राव एवढं मनावर घेता ?'

श्री. ×× यांनी हातातला पेपर श्री. ××× यांच्यासमोर धरून विचारले–' अरे पण हे वाचा ! राष्ट्रपती श्री. गिरी यांनी रशियाने छापलेल्या नकाशांचा प्रश्न श्री. पोडगोर्नी यांच्याकडे काढला.'

श्री. ×× म्हणाले–' प्रश्न काढला ! पण झालं काय ?–पुढं वाचा राव–' पोडगो...पोडगोर – पोडगोरनी म्हणाले की नकाशात काही चुका झाल्या आहेत, उदाहरणार्थ – काश्मीर हा आम्ही भारताचा दाखवला आहे ! ' आयला त्या पोडगो ऽऽ च्या ! काश्मीर काय त्याच्या बाचा हाये ?'

श्री. ×× यांनी विचार केला. आपण राष्ट्रपतींप्रमाणे वागले पाहिजे. आईवरून शिवी दिली म्हणून आईला प्रत्यक्ष काहीच होत नाही ! दिली तर दिली. मग ते श्री. ×× यांचेसाठी कोचावर जागा करीत म्हणाले–

' बसा ×× ! आम्हाला घेता का इंदिरा कॉंग्रेसमधे ?'

यावरून आम्हाला आठवण झाली ती आमच्या मास्तरांची. मास्तर किपलिंगची कविता शिकवत होते–

' If I were hanged on the highest hill
Mothor O' mine, O' mother O' mine !
I know whose love would follow me still
Mother O' mine O' mother O' mine '

सोपा अर्थ मास्तर पुनः पुनः सांगत होते– ' कवी म्हणतो ' जर मला एखाद्या उंचच उंच टेकडीवर फाशी जाण्याचा प्रसंग आला तर तिथेही माझ्या मागे तेथपर्यंत कुणाचं प्रेम धावत येईल–आई-आई फक्त तूच मला आठवशील.' नेहमीप्रमाणे आमच्या वर्गात मग प्रश्नोत्तरे सुरू झाली. म्हणजे प्रश्न मास्तरचे आणि चुकीची उत्तरे आमची. सारखे मास्तरानीच प्रश्न विचारावे, याचा आपल्याला नेहमी कंटाळा यायचा. आम्ही बोट वर केले ! मास्तर म्हणाले–येस्...आम्ही विचारले– " If mother were hanged whose love will follow her still ?' मास्तर संतापले. आम्हाला त्यांनी वर्गाबाहेर हाकलून दिले. वर्गाबाहेर जाण्याचे फारसे दुःख नव्हते, कारण आमचा शाळेतला वेळ वर्गातल्यापेक्षा वर्गाबाहेरच अधिक जाई. चांगला जाई ! असा आम्ही काय बरे गुन्हा केला होता, की मास्तरानी आम्हाला वर्गातून हाकलून काढावे ? आम्ही आपले सहज विचारले.–' जर आईला कुणी टांगली तर तिच्या प्रेमाचा उतराई कोण होईल ?'

आज मास्तर हवे होते. गेले बिचारे. त्यांना आज कळले असते आमचा बाल-बुद्धीचा प्रश्नच बरोबर होता. जो उठतो तो आईच्या प्रेमाचे महत्त्व सांगतो. मातृदेवतेचे महन्मंगल स्तोत्र वगैरे म्हणतो. माता अशी आहे. माता तशी आहे. आमचा त्यांच्याशी तंटा नाही. पण या मातृप्रेमात आकंठ बुडया मारणारी जी लेकरे त्यांचं काय ? बाकी लेकरांचा तरी काय दोष म्हणा ! पुढच्या पिढ्या फक्त कदाचित विचारतील–

आइ वरुना काणा, अपशब्द चार वदल
त्याने मुळी जिवाला, काहीच नाही झाले !
माता मरून गेली, गाता असे तराणे
कमरेस नाही काही, ते कोणते घराणे ?

या लेकरांना मातेचे ऋणी वगैरे असण्याचे काही कारण नाही. हल्ली माताच मुलांच्या ऋणी असतात आणि त्यांना उतराई कसे व्हायचे हे कळत नाही. ती पहा भारतमाता ! कपाळाला हात लावून म्हणते आहे–

'बाळा होऊ कशी उतराई
तुझ्यामुळे मी झाले आई ऽऽ'

## महापुरुष संपत आले !

मराठी साहित्यात महापुरुषांच्या जीवनावर कादंबऱ्या सुरू होऊन पाच-सात वर्षे झाली. नुकतीच वि. स. खांडेकर यांना साहित्य अॅकेडेमीची फेलोशिप मिळाली. त्या समारंभानंतर श्री. खांडेकर यांनी सांगितले–

'लोकमान्य टिळकांच्या मृत्यूपासून ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अखेरीपर्यंत जीवनाच्या विकासाचे व अधःपाताचे यथार्थ दर्शन घडवणारी 'हृदय यात्रा' नावाची चार खंडाची कादंबरी आता मी लिहिणार आहे.'

वस्तुतः ही कादंबरी ७-८ खंडांची झाली असती. परंतु शिवाजी महाराजापासून तो माधवराव पेशव्यांपर्यंत सर्व महापुरुषांवर रणजित देसाई यांनी कबजा केला, राघोभरारी ते दुसरा बाजीराव हा मुलुख ना. सं. इनामदारांनी तोडून घेतला. भा. द. खेर यांनी लालबहादुर शास्त्रींकडून चौथाई सरदेशमुखी वसूल केली. गंगाधर गाडगीळ जातीने लोकमान्य टिळकांना भिडले. सर्वत्र असा एकच हल्लकल्लोळ माजला असताना, सौ. मृणालिनी देसाई यांनी महात्मा गांधींवर छापा घातला ! साहित्यातील ही बंडाळी संपवावी, म्हणून बहुधा वि. स. खांडेकरांनी, टिळकांच्या मृत्यूपासून ते जवाहरलाल नेहरूंच्या मृत्यूपर्यंत सर्व प्रदेश आपल्या अंमलाखाली ओढलेला आहे. हे जरा जास्तच झालं. परंतु हरकत नाही.

आमच्या दृष्टीने आता इंदिरागांधी व संजीव गांधी ही दोनच माणसे मोकळी आहेत. ज्या लेखकांना महापुरुषांच्या आयुष्यावर 'कादंबरीमय जीवन' किंवा 'जीवितमय कादंबरी' यातले काहीही लिहिण्याची इच्छा असेल, त्यांनी त्वरा करून, निदान तावडतोब तशी घोषणा करणे अगत्याचे झाले आहे.

पाच सात स्त्री लेखिकांनी मिळून इंदिराजींवर का लिहू नये बाई कादंबरी ? संजीव गांधीवर एखाद्या फुलामुलांच्या लेखकाने कादंबरी लिहिली तर ती मुलांना खूपच आवडेल नाही का ?

**– सेना महाराज**

## उत्तर प्रदेश

# खुर्च्यांचे राजकारण

उत्तर प्रदेशात सध्या जे राजकारण चालू आहे, त्यामुळे कोणत्याही सुबुद्ध, विचारी माणसाला लाज वाटावी. तत्त्वे, लोकहित, आचारशुद्धी, संयम या सर्व साध्या गोष्टींना सरळ तिलांजली देऊन केवळ सत्तेसाठी नागडी स्पर्धा कशी चालते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे उत्तर प्रदेशात गेल्या पंधरवड्यात तथाकथित लोकनेत्यांनी केलेले हिडीस नृत्य. या राज्यातील नद्यांना गेल्याच महिन्यात महापूर येऊन शेतीचे मोठे नुकसान होऊन प्रचंड जीवितहानीही झाली आहे. पण तिकडे कुणाचे लक्ष आहे? कारण राजकारणात खरे महत्त्व आहे सत्तेला. गोरगरीब जनतेची जागा राजकारणात सर्वांत शेवटची आहे. उत्तर प्रदेशाने हे ढळढळीतपणे दाखवून दिले आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री चरणसिंग यांच्या भारतीय क्रांती दलाचे बळ राज्याच्या ४२५ संख्येच्या विधानसभेत केवळ ९०च्याही खाली होते. सर्वांत मोठा पक्ष नवी कॉंग्रेस. या पक्षाच्या कुबडीवर चरणसिंग उभे होते. अर्थात चरणसिंगांना आधार देण्यात नव्या कॉंग्रेसचा फार उदात्त हेतू होता, असा कुणीही आरोप करू शकणार नाही. संधी साधून भा. क्रां. दला आणि पर्यायाने उ. प्र. ला खिशात टाकणे हे नव्या कॉंग्रेसचे ध्येय होते. त्या पक्षाचे हे स्वप्न गेल्याच महिन्यात महत्त्वाकांक्षी चरणसिंगांनी पार उधळून लावले. त्यामुळे नव्या कॉंग्रेसने डूख धरून चरणसिंगांनाच उखडून लावण्याचा चंग बांधला.

पण पहिला टोला चरणसिंगांनीच हाणला. त्यांनी आपल्या संयुक्त मंत्रिमंडळा-तील २६ कॉंग्रेस मंत्र्यांपैकी १३ जणांना गचांडी दिली. तेराच जणांना काढले म्हणजे थोडी फूट पाडता आली तर बघावी हाही एक उद्देश. पण मुख्य मंत्र्यांनी काढून टाकले म्हणून गाद्या सोडायला कॉंग्रेसमंत्री काही बोळयाने दूध पिणारे नव्हते. ते पडले पक्के खुर्ची-चिकटू. वास्तविक पाहता कोणत्याही मंत्र्याला काढून टाकण्याचा मुख्य मंत्र्यांना अधिकार आहे. पण कॉंग्रेसमंत्र्यांनी आपल्या खुर्च्या सोडल्या तर नाहीच, उलट चरणसिंगांनाच त्यांनी उलथवून लावायचे ठरविले, आणि त्यांनी चरणसिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला.

म्हणजे ४२५ च्या विधानसभेत चरणसिंग आता ८७–८८ वर आलेल्या भा. क्रां. द. च्या जोरावर सरकार कसे चालविणार ? पण चरणसिंग काही लेचेपेचे नव्हते. खुर्चीवर जास्तीत जास्त कसे चिकटून रहायचे याचे शास्त्र म्हणजे राजकारण. चरणसिंग तर पक्के राजकारणी. पक्षातून फुटून निघून दुसरे सरकार स्थापन करणे, आयाराम–गयाराम, सरकार स्थापन करताना इतर पक्षांना जास्तीत जास्त खड्ड्यात टाकणे हे भारतीय राजकारणातील नवीन शोध त्यांनीच लावले आहेत. त्यामुळे खुर्चीला चिकटून राहण्याची त्यांची क्षमता प्रचंड आहे. नव्या काँग्रेसने पाठिंबा काढून घेताच ते घाबरले नाहीत. ते म्हणाले, विधानसभेचे अधिवेशन सहा ऑक्टोबरला आहे. तिथे ठरव कोणाला पाठिंबा जास्त आहे.

नवी काँग्रेस जाण्याचीच वाट पाहत असलेली जुनी काँग्रेस, जनसंघ आणि स्वतंत्र हे पक्ष हपापल्याप्रमाणे श्री. चरणसिंग यांच्या मदतीला धावले. आणि आपण नवी आघाडी स्थापन करीत असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे या नव्या आघाडीचे बळ २३६ आहे. नव्या काँग्रेसचे म्हणणे हा आकडा २०६ च्या वर नाही.

एवढ्यावर हे प्रकरण थांबायला काही हरकत नव्हती. कारण सहा ऑक्टोबरला सोक्षमोक्ष लागेल. सहा ऑक्टोबर काही दूर नव्हते. आणि जेव्हा इंदिरा गांधींचे केंद्र सरकार असेच अल्पमतात गेले असताना त्यांनीही पार्लमेंटचाच कौल मागितला होता. पण दुतोंडीपणा करण्यात पटाईत झालेली नवी काँग्रेस उत्तर प्रदेशात मात्र इतकी अधीर झाली होती की सहा ऑक्टोबरपर्यंत वाट बघणे त्या पक्षाला कष्टाचे वाटत होते. नव्या काँग्रेसचे पुढारी कमलापती त्रिपाठी यांनी आपलेच घोडे पुढे दामटले. आपल्याला सर्वात मोठा पक्ष म्हणून सरकार बनवावयास परवानगी मिळावी असा त्यांनी अर्ज केला.

अशा तऱ्हेने एकमेकाला खुर्चीवरून ढकलण्याची स्पर्धा सुरू असताना उत्तर प्रदेशाचे राज्यपाल डॉ. गोपाळ रेड्डी यांनी चरणसिंगांना राजीनामा देण्याचा आदेश दिला. नव्या काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्यावर अधिकारावर राहण्याचा चरणसिंगांना हक्क नाही, असे डॉ रेड्डी यांनी सांगितले. दरम्यान इंदिरा गांधींनी अॅटर्नी जनरलची भेट घेऊन त्यांना आपले मत द्यायला सांगितले होते. चरणसिंगांनी राजीनामा दिला पाहिजे.

एवढ्यावरही थांबले नाही. जुन्या काँग्रेसच्या नेत्यांचे म्हणणे हे की एक तर विधानसभेचे अधिवेशन इतक्या जवळ आले असताना राज्यपालांना मुख्य मंत्र्यांचा राजीनामा मागता येत नाही. राजीनामा मागणीचे हे कृत्य राज्यपालांनी इंदिरा गांधींच्या दडपणामुळे केले असा गंभीर आरोपही जुन्या काँग्रेसच्या नेत्यांनी केला. चरणसिंगांनी सांगितलेल्या काँग्रेसमंत्र्यांना काढून टाकण्यासही राज्यपालांनी नकार दिला.

राज्यपालांनी सोमवार संध्याकाळपर्यंत चरणसिंग यांनी राजीनामा द्यावा असा आदेश दिला होता. पण चरणसिंगांनी तोवर काही राजीनामा दिला नव्हता. दरम्यान त्यांनी राजीनामा दिल्याच्या, न दिल्याच्या वार्ता सर्वत्र पसरत होत्या. चरणसिंग घट्ट चिकटून होते.

इकडे जुन्या काँग्रेसचे विधानसभेतील नेते गिरीधारीलाल यांनीही सरकार बनविण्याची तयारी दाखविली. कारण जुन्या काँग्रेसच्या नेत्यांनी चरण आघाडीला पाठिंबा देण्याचे ठरविले ते काही भा. क्रां. द. च्या प्रेमातून नव्हे. चरणसिंगांचे खरे शत्रू जुन्या काँग्रेसमध्येच आहेत. जुन्या काँग्रेसचे उत्तर प्रदेशातील नेते चंद्रभानु गुप्ता हे त्यांचे शत्रू नंबर एक. १९६७ मध्ये यांच्याशीच वैयक्तिक मतभेद होऊन चरणसिंग काँग्रेस-बाहेर पडले होते. त्यामुळे जुन्या काँग्रेसमधील बरेच लोक चरणसिंग सरकारशी लग्न करायला तयार नाहीत. तशी जर पाळी आलीच तर जुन्या काँग्रेसमधील आणि शुद्ध भा. क्रां. द. मधील बरेच आमदार फुटून आपल्या पक्षाला मिळतील अशी नव्या काँग्रेसला आशा आहे. त्या जोरावरच त्यांच्या उड्या आहेत.

इंदिरा गांधींनी अनेक राज्यांत आपल्या कौशल्याने स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले आहे. पण स्वतःच्या राज्यात मात्र त्यांना हे कठीण गेले आहे. आणि उत्तर प्रदेशात काय घडते यावर १९७२ सालचे साऱ्या देशाचे चित्र अवलंबून आहे. म्हणून इंदिरा गांधींची अधीरता समजण्यासारखी आहे.

—अरुण गोसावी

---


लोकशाही आणि समाजवाद यांच्या कितीही वल्गना होत असल्या तरी सर्वसाधारण नागरिकांचे दैनंदिन जीवन असुरक्षित आहे. शिलाँग येथील एका चित्रपटगृहामध्ये एक देखणी मुलगी चित्रपट पहावयास आली. थिएटर मालकाला मुलगी अतिशय आवडली. त्याने काय करावे ? आसाम विधान-सभेतील विरोधी पक्षाचे नेते श्री. रवींद्रनाथ सेन यांच्या माहितीप्रमाणे किस्सा खालीलप्रमाणे आहे: चित्रपट चालू असताना थिएटर मालकाने आपल्या नोकराला त्या मुलीस बोलवून आणण्यास सांगितले. काहीतरी कारण सांगून नोकराने मुलीस बाहेर काढली. बाहेर आल्यावर मुलीला काही संशय आला, परंतु तिला पळून जाण्याची अथवा आरडाओरडा करण्याची संधी मिळण्यापूर्वीच तिला बळजबरीने मालकाच्या खाजगी खोलीत नेण्यात आले. मुलीवर अत्याचार करण्यात आला. या अत्याचाराची तक्रार नोंदवण्याचे धाडस पोलिसांना झाले नाही. पुढे असेंब्लीमध्ये ओरड झाल्यावर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घातले. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

—एस्.

---

युद्धस्य कथा

संजीवनी खेर



# क्लेरा फिलिप्स

युद्धात अनेकांची कर्तबगारी, धैर्य, साहस पणास लागते. सामान्यातील सामान्य मनुष्य कर्तव्यभावनेने, देशप्रेमाने झपाटला जाऊन अलौकिक कार्य करून जातो काहींची नोंद इतिहासात होते तर काहींची नोंद घ्यायलाही कुणी हजर नसते. ही अशीच गोष्ट आहे सामान्य स्त्रीची. जिच्या मनातील संतापाने व देशप्रेमाने अनेक जपानी सैनिकांना मृत्युमुखी पाडले. जिने अनंत हालअपेष्टा सहन केल्या. पण शत्रूला माहिती पुरविली नाही. त्या अलौकिक स्त्रीने शत्रूची अनेक बिंगे फोडली. त्यांना हैराण करून सोडले. त्या स्त्रीचे नाव आहे – श्रीमती क्लेरा फिलिप्स.

क्लेरा फिलिप्स आपल्या तान्ह्या कन्येसह – डायनासह – आपल्या पतीच्या निकट राहण्याचा प्रयत्न सोडून १९४२ साली घाबरलेल्या हरिणीसारखी जंगल-दऱ्याखोऱ्यातून आश्रय घेत फिरत होती. प्रथम ती बॅटन येथे रहात असे; पण अमेरिकन फौजांनी बॅटनमधून माघार घेतल्यावर मात्र तिला तेथून परागंदा होण्या-खेरीज दुसरा मार्ग नव्हता. ह्या दिवसात डायनालाही मलेरियाने ग्रासले होते व डॉक्टरी उपचारासाठी तिने मनिलाला पलायन करायचे ठरविले. तिच्या मते तिच्या ह्या दशेला जपानीच जबाबदार होते. त्यामुळेच तिच्या मनात जपान्यांबद्दल तीव्र संताप व तिरस्कार होता. आपल्याला झालेल्या त्रासाचे उट्टे तिने जपान्यां-विरुद्ध हेरगिरी करून काढायचे ठरविले. तिच्या निकटवर्तीयांनी तिला संभाव्य धोक्याची कल्पना दिली व नाद सोडून द्यायला सांगितले, पण क्लेरा आपल्या निश्चयापासून ढळली नाही.

थोड्याच दिवसात तिने समुद्रकिनारी एक अत्याधुनिक नाईट क्लब सुरु केला उच्चभ्रू समाजालाच परवडेल असे एक प्रतिष्ठेचे स्थान म्हणून तो क्लब ओळखला जाऊ लागला. इरिमा विभागातील हा क्लब सागरी माहितीच्या दृष्टीने अत्यंत मोक्याच्या जागी होता. एका फिलीपाइन तरुणीच्या सहाय्याने तिने 'टुसुबाकी' क्लब मोठ्या ऐटीमध्ये चालू केला होता. ह्या तरुण सुंदरीचे नाव फेली कुकुआस होते. तिनेच क्लेराला अनेक वेळा प्राणसंकटातून वाचविले होते. क्लबची सारी व्यवस्था फेली व क्लेरा पहात. इतर क्लबमध्ये आठवड्यातून एकदाच नृत्यकार्यक्रम होत असत, तर टुसुबाकीत रोज नृत्यकार्यक्रम होत असत. रोज नावीन्य, अतीव मार्दव, मादक सेविका व आदरातिथ्य ह्यामुळे उच्चपदस्थ आरमारी अधिकाऱ्यांच्या आकर्षणाचे केंद्र बनले टुसुबाकी.

प्रथम प्रथम अधिकारीवर्ग जादा किंमतीबद्दल तक्रार करी पण क्लेरा मोठ्या कौशल्याने त्यांच्या अहंला सुखावीत 'प्रतिष्ठेसाठी व खास वागणुकीसाठी पैसेही द्यावे लागतात. पैशासाठी खळखळ करणारे तुम्ही लोक नाही हं!' असे सांगी. कधी जर सैनिकांनी पिऊन गोंधळ केला, हॉटेलचे नुकसान केले तरीही क्लेरा तक्रार कधी वरच्या अधिकाऱ्यांकडे नेत नसे. त्यामुळे सैनिक, अधिकारी ह्यांचे क्लेराबद्दल फारच अनुकूल मत झाले होते. चांगलेच सलोख्याचे संबंध तिने प्रस्थापित केले.

जपानी सैन्यात नृत्याबद्दल मोठे विचित्र नियम होते. सहसा नृत्यासारखे मनोरंजन युद्धात क्षम्य असते. पण इथे अधिकाऱ्यांना नृत्यांगनांसह नृत्य करायची परवानगी नव्हती. पण तरी क्लेरा सारे चालू द्यायची. अधिकाऱ्यांची मने तिला जिंकायची होती. अन्यथा अंतर्गत माहिती तिला कशी प्राप्त झाली असती? अशाच एका रात्री एक अधिकारी नृत्यांगनेबरोबर नृत्य करीत असता लष्करी पोलीसांनी क्लबवर अचानक धाड घातली. अधिकाऱ्याला दमदाटी केली व श्रीमुखात भडकावली. जाता जाता क्लेराला क्लब बंद पाडायचीही धमकी दिली. क्लेराची भीतीने गाळण उडाली. पण फेली तिच्या मदतीला आली. तिने लष्करी पोलीसांना लाडे लाडे सारे सांगितले. सर्वांच्या मुठी गरम केल्या, क्षणार्धात सारे शांत झाले. अधिकाऱ्याने सुटकेचा श्वास सोडला. क्लेरा व क्लब अधिकच विश्वासपात्र झाला. झाले, मग रात्रीमागून रात्री अधिकारी येतच राहिले व क्लेराला मनमोकळेपणाने सारे सांगत राहिले.

हळू हळू क्लेराने आपले खरे काम सुरू केले. क्लेराने एका गुरीला कॅप्टनशी संगनमत केले व त्याच्यामार्फत तिने बातम्या पाठवायला सुरुवात केली. अमेरिकन फौजांना ह्या बातम्यांच्या विश्वासार्हतेने खूप मदत झाली. तिचे गुप्त नाव ठायपॉकेट होते. तिने सारे गुप्तसंकेत स्वयंपाकाच्या भाषेत ठरविले. महत्त्वाची बातमी असेल तर 'अंडया ताज्या आहेत आज.' तर बिनमहत्त्वाची बातमी 'कोंबी शिळा

झालाय.' अशी येई. त्यांचे बातमीदार कधी बुटांच्या तळव्यात पत्रे लपवीत तर कधी केळे पोखरून त्यात चिठोरे ठेवीत. महिन्यातून एकदा क्लेरा त्या कॅप्टनला फळे, औषधे व माहिती पाठवीत असे.

तर कधी अगदी सहज बोलण्यातून महत्त्वाच्या बातम्यांचा पत्ता लागे. असेच एकदा एका पट्ट्या बांधून आलेल्या, पिऊन तर्र झालेल्या अधिकाऱ्याने क्लबमध्ये प्रवेश केला. क्लेराने घाबरुन त्याला पृच्छा केली, 'कुठे इतके जखमी झालात?' तो खो खो हसून म्हणाला, 'अग हे सारे ढोंग त्या मूर्ख अमेरिकनांना फसवायला! सारी नव्या दमाची तुकडी आणली आहे रेडक्रॉसच्या गाड्यांमधून. म्हणजे त्यावर बॉंब हल्ले होणार नाहीत म्हणून.' क्लेराने लागलीच बातमी कॅप्टनकडे पोचवली की जपानी सैनिक रेडक्रॉसच्या गाड्या लष्करी हालचालींसाठी वापरतात. अन् थोड्याच दिवसात युद्धसंकेत झुगारून रेडक्रॉसच्या मोटारींवरही बॉंबहल्ले सुरू झाले.

अशीच माहिती फेलीने आपल्या जपानी अधिकारी मित्राकडून मिळविली. ह्या अधिकाऱ्याची व फेलीची चांगलीच मैत्री जमली होती. त्याला आघाडीवर जाताना फेलीने अश्रूपूर्ण नेत्राने निरोप देत विचारले, 'सख्या, पत्र कुठे पाठवू तुला?' त्याने सहज उत्तर दिले, 'मी इथून सिंगापूरला व तिथून राबूलला जाणार आहे.' क्लेराला इशारा पुरेसा होता. तिने बातमी योग्य ठिकाणी पोहचविली. बातमी पुरविल्याचा परिणाम एका रात्री एका अधिकाऱ्याने फेलीला सांगितले 'खेदाची गोष्ट आहे तुझा प्रियकर व बोटीवरील सर्व अधिकारी मारले गेले' फेलीने नक्राश्रू ढाळले मेलेल्या प्रियकरासाठी.

काही अधिकारी फेलीच्या संगीतावर खूष होते तर काही क्लेराच्या पंखानृत्यावर. तिचे घट्ट, तलम वस्त्रांकित शरीर नृत्यात असे बेभान व्हायचे की प्रेक्षकही तिला पहायला वेडे होत. आपल्या निकट मित्रांना घेऊन येऊन तिला नृत्य करताना दाखवीत. एका रात्री तिला तेच नृत्य पुनः करण्याचा, सविनय आग्रह होऊ लागला. एका अधिकाऱ्याने गौप्यस्फोट केला 'असे नृत्य उद्या पहायला मिळणार नाही आम्हाला. सकाळीच सॉलोमन बेटाकडे आम्ही रवाना होत आहोत.' झाले विनायास न विचारता महत्त्वपूर्ण बातमी मिळाली. क्लेराने ती तातडीने अमेरिकन अधिकाऱ्यांना कळवली. थोड्याच दिवसात सालोमनकडे जाणाऱ्या बोटीतील मोजकी माणसे जिवंत राहून बाकी सर्व गारद झाल्याची वार्ता क्लेराच्या कानी आली.

दरम्यान क्लेराचा पती युद्धबंदीवासात उपासमारीने मेल्याची बातमी तिच्या कानी आली. क्लेरा आता खूप पैसा मिळवत होती पण पतिनिधनाचे दुःख तिला असह्य झाले. तिने क्लबच्या कामाबरोबरच कैद्यांच्या सोयीसाठी मदत कार्य हातात घेतले. कैद्यांना ती पैसे, अन्न, विटामिन्स, औषधे, वस्त्रे पाठवू लागली. दारवानांना, रखवालदारांना कॅमेरा, घड्याळे व चैनीच्या वस्तूंची लांच देऊ लागली. अर्थात ह्या कामाबरोबर बातम्यांची देवाणघेवाण चालू होतीच.

तिचे काम सुरू होऊन २ वर्षे झाली झाली होती. १९४४ मध्ये तिचा विश्वासू बातमीदार धरला गेला व अशीच अकल्पित तीही धरली गेली. आता तिला ब्रह्मांड आठवले. कैद्यांच्या हालाचे चित्र तिच्या डोळ्यासमोर तरळून गेले. आपले हाल होणार व कशा अवस्थेत मृत्यू येणार याचीच ती प्रतीक्षा करू लागली. तिला सैनिकानी अधिकाऱ्यासमोर उभी केली तेव्हा अधिकाऱ्याने सरळ तिला तिच्या गुप्त सांकेतिक हायपॉकेट ह्या नांवानेच संबोधले. तिला वाटले संपले आता. सुटकेची आशाच नको. तिने पाठविलेल्या पत्रातील प्रत्येक शब्दाचा अर्थ काढून घेण्यासाठी तिला कल्पनातीत मारण्यात आले. तिचे हातपाय बांधून पाण्याचा जोरदार मारा तिच्यावर करण्यात आला. त्रासाने ती बेशुद्ध पडली. पण त्रासाला घाबरून तिने रहस्यभेद केला नाही. खाद्यपदार्थांच्या वस्तूंचा श्लेष अर्थ तिने मुळीच सांगितला नाही. तिने लिहिलेल्या वस्तूंचे अर्थ तिने डिक्शनरीत त्यांना दाखवून दिले की ते खाद्यपदार्थांच्या नावाचेच द्योतक आहेत.

ती शुद्धीवर आल्यावर तिने दिलेल्या प्रश्नोत्तरांनी समाधान होऊन तिच्या डोळ्यावरची पट्टी काढण्यात आली. ३ आठवड्यापर्यंत तिला एकटीला अंधार-कोठडीत डांबण्यात आले.सिगारेटच्या चटक्यांनी तिच्या अंगाची कातडी हुळहुळत होती. तिला कोठडीत ३ कप पाणी व १ कप भात असा सकस आहार मिळत होता. तिच्याकडून उत्तरे काढण्यासाठी थोडथोड्या दिवसांच्या अंतराने पुन: तेच तेच प्रश्न विचारले जात. फक्त छळाचा प्रकार दरवेळी नवा असे. पायाला खिळे ठोकणे, तलवारीचे टोक गळ्याला थोडेथोडे भोसकणे इत्यादी अनेक प्रकार तिने सहन केले, पण सहायकांची नावे सांगितली नाहीत. अखेर तिने अपराधी म्हणून कबूल केले. लष्करी कोर्टाने तिला सक्तमजुरीला पाठविले. तेथे केळ्यांच्या साली खाऊन गुजराण करावी लागत होती. हळूहळू क्लेरा त्या जीवनात रुळू लागली. मनाचे व शरीराचे घाव हळूहळू भरू लागले. व अशातच १९४५ सालच्या फेब्रुवारीत स्वातंत्र्याची आकांक्षा घेऊन (अमेरिकन) सैनिकांनी जपान्यांची पीछेहाट केली. तुरुंगाची बंधने तुटली. फाटके कपडे, दयनीय शरीर, पण प्रफुल्लीत मनाने, डायनाच्या वात्सल्याच्या ओढीने क्लेराने तुरुंग सोडला व मायभूमी गाठली.

❋

# पराजित – अपराजित



वि. स. वाळिंबे | लेखांक : वीस

एक सप्टेंबरची पहाट. हिटलरच्या साक्षीने 'केस व्हाईट'ला प्रारंभ झाला होता. जर्मन लष्कराच्या आघाडीच्या पथकांनी पोलंडची सीमा ओलांडली होती. हिटलरचे विमानदल पोलिश शहरांवर आग ओकू लागले होते. काय घडत आहे हे कळायच्या आतच असंख्य निरपराध पोलिश नागरिक मृत्युमुखी पडत होते.

सकाळी आठ वाजता ही बातमी दलादिए आणि बॉन्ने यांना कळली तेव्हा ते हबकलेच. फ्रान्सने आता नेमके काय केले पाहिजे याचा प्रथम त्यांना उलगडाच होईना. फ्रान्सच्या परराष्ट्रीय धोरणाचे हे दोन सूत्रधार अक्षरशः बावरून गेले होते. हिटलरला रोखण्यासाठी आपण आता प्रत्यक्ष कृती केली पाहिजे हे त्यांना जाणवत नव्हते असे नाही, पण ती जबाबदारी आपल्याला पेलेल किंवा नाही यासंबंधी ते साशंक होते.

फ्रेंच नेतृत्वाची ही मनःस्थिती मुसोलिनीला चांगली माहिती होती आणि त्यामुळेच त्याने आदल्या दिवशी, पोलंड–प्रश्नाचा विचार करण्यासाठी ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि इटली यांची पाच सप्टेंबरला बैठक बोलवावी अशी सूचना

केली होती. बॉन्ने याला तेवढा आधार पुरेसा होता. त्याने रोममधील आपला राजदूत फ्रॅन्क्वा-पोन्से याला तार केली-" युरोपमधील शांततेचे रक्षण करण्यासाठी मुसोलिनी जो प्रयत्न करीत आहे तो स्वागतार्ह आहे. पाच सप्टेंबरच्या बैठकीची सूचना आम्हाला मान्य असल्याचे तू इटालियन परराष्ट्रमंत्री काऊंट कियानो याला कळव. मात्र आमची एकच अट आहे – या बैठकीचे पोलंडलाही निमंत्रण गेले पाहिजे."

मुसोलिनीच्या सूचनेबद्दल ब्रिटनचे मत जाणून घ्यायला बॉन्ने उत्सुक होता. म्हणून त्याने ब्रिटिश परराष्ट्रमंत्री लॉर्ड हॅलिफॅक्स याला फोन केला. त्यावेळी हॅलिफॅक्स बॉन्नेला म्हणाला, "पोलंडचा प्रश्न वाटाघाटींनी सुटला तर ते आम्हालाही हवं आहे. परंतु जर्मनीनं पोलंडवर आक्रमण केल्यानंतर आता वाटाघाटींचा मार्ग बंद झाला आहे असं नाही तुम्हाला वाटत ?"

बॉन्ने याला तसे वाटत नव्हते. पोलंडने वाटाघाटीत सहभागी होण्याची तयारी दर्शविली तर आपल्याला बैठकीची सूचना पुढे रेटता येईल असे त्याचे मत होते. म्हणून पाच सप्टेंबरच्या बैठकीसाठी पोलंडची संमती मिळविण्याची कामगिरी त्याने वॉर्सातील फ्रेंच राजदूत नोएल याच्यावर सोपविली. त्याप्रमाणे नोएल पोलिश परराष्ट्रमंत्री बेक याच्या भेटीला गेला. पोलंडवर जर्मनीने आक्रमण सुरू केल्यावरही फ्रान्सला वाटाघाटींचा मोह पडावा याचे बेक याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "जर्मन लष्कर आमच्या भूमीवर उतरलं आहे. जर्मन विमानं आमच्या शहरांवर बाँबवृष्टी करीत आहेत. अशा वेळी, हे आक्रमण कसं रोखायचं याचा विचार करण्याऐवजी फ्रान्सनं आम्हाला वाटाघाटींची सूचना करावी याच मला आश्चर्य वाटतं."

बेक याचे हे उत्तर पॅरिसला येऊन पोचण्यापूर्वीच हॅलिफॅक्स याने बॉन्ने याला टेलिफोन करून सांगितले होते – "जर्मनीनं पोलंडमधून आपलं सैन्य तावडतोब मागं घेतलं नाही तर आम्हाला पोलंडच्या मदतीला जावं लागेल असं आजच आपण हिटलरला कळविलं पाहिजे."

हॅलिफॅक्स याचा हा आग्रह मान्य करण्यावाचून बॉन्ने याला गत्यंतर नव्हते. त्यामुळे त्याने बर्लिनमधील फ्रेंच राजदूत कोलोन्द्र याला रिबेन्ट्रॉपची भेट घेण्याबाबत कळविले. हॅलिफॅक्स याच्याकडून ब्रिटिश राजदूत सर नेव्हिल हेंडरसन याला अगोदरच तसा निरोप आलेला होता. पोलंडच्या मदतीला जाण्याबाबत ब्रिटन आणि फ्रान्स यांचा निर्धार झालेला आहे हे जर्मनीला कळावे म्हणून हेंडरसन आणि कोलोन्द्र यांनी एकाच वेळी रिबेन्ट्रॉपच्या भेटीला जावे असा मूळचा बेत होता. परंतु रिबेन्ट्रॉपने त्या दोघांना एकाच वेळी भेटायला नकार दिला; म्हणून रात्री नऊ वाजता हेंडरसन रिबेन्ट्रॉपच्या भेटीला गेला आणि त्यानंतर तासाभराने रिबेन्ट्रॉप आणि कोलोंद्र यांची भेट झाली. जर्मनीने पोलंडवर आक्रमण केलेले आहे ही वस्तुस्थिती मान्य करायला रिबेन्ट्रॉपची तयारी नव्हती. तो कोलोन्द्र याला म्हणाला,

"पोलंडनं आमच्यावर हल्ला चढविल्यामुळं आम्हाला स्वसंरक्षणासाठी हे पाऊल उचलावं लागलं आहे."

कोलोन्द्र उत्तरला, "ते काहीही असो, आज जर्मन सैन्य पोलिश प्रदेशात घुसलेलं आहे ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. तुम्ही हे सैन्य ताबडतोब मागं घेतलं नाही तर आम्हाला पोलंडच्या मदतीला जावं लागेल."

"ठीक आहे. तुमचा निरोप मी 'फ्युरर'ला कळवितो," रिबेन्ट्रापने उत्तर दिले आणि ही भेट आटोपली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे दोन सप्टेंबरला जर्मन सैन्याने आणखी आगेकूच केली. पोलिश शहरांवरील बाँबवर्षावाचे प्रमाणही वाढले होते. तरीदेखील पाच सप्टेंबरच्या बैठकीची आपली सूचना, ब्रिटन आणि जर्मनी यांनी मान्य करावी या दृष्टीने मुसोलिनीचे प्रयत्न सुरूच होते आणि मुसोलिनीचे हे प्रयत्न यशस्वी व्हावेत अशी बॉन्ने मनोमन प्रार्थना करीत होता.

पोलंडच्या जीवनमरणाचा प्रश्न उभा ठाकलेला असतानाही फ्रान्सने वाटाघाटींच्या घोळात सापडावे हे पाहून पोलिश नेत्यांचा संताप पराकोटीला गेला. पॅरिसमधल्या पोलिश राजदूताने बॉन्ने याला स्पष्टच विचारले, "पोलंडवरील आक्रमण सुरू झाल्याला छत्तीस तास होऊन गेले आहेत. अजूनही फ्रान्सनं कोणताच निर्णय केलेला नाही. फ्रान्स आमच्या मदतीला येणार आहे की नाही हे तरी एकदा आम्हाला कळू द्या?"

बॉन्ने उत्तरला, 'आज दुपारी फ्रेंच संसदेची बैठक भरल्यानंतर काय ते ठरेल."

जर्मनीला निर्वाणीचा खलिता धाडण्याबाबत फ्रान्स दिरंगाई करीत आहे ही गोष्ट ब्रिटनलाही पसंत नव्हती. बरे, आपण एकट्याने हिटलरविरुद्ध युद्ध पुकारावे असेही ब्रिटनला वाटत नव्हते. ब्रिटन आणि फ्रान्स एकदिलाने उभे राहिले तरच कदाचित हिटलर, पोलंडच्या निमित्ताने युद्धाचा धोका पत्करावा की नाही याचा विचार करील हे ब्रिटिश नेत्यांना ठाऊक होते. आपल्या सरकारची ही निष्क्रियता पाहून ब्रिटिश जनमत प्रक्षुब्ध झाले होते. त्यामुळे निर्वाणीचा खलिता धाडण्याबाबत फ्रान्सचा होकार मिळविण्यासाठी चेंबर्लेन आणि हॅलिफॅक्स यांची एकच धावपळ उडाली होती. पॅरिसमधील ब्रिटिश राजदूत सर एरिक फिप्स याला हॅलिफॅक्सने धाडलेल्या तारेत ब्रिटिश सरकारची अवस्था स्पष्ट होते. हॅलिफॅक्स याने म्हटले होते –" फ्रान्सच्या दिरंगाईमुळे आमची पंचाईत झालेली आहे. म्हणून, निर्वाणीचा खलिता धाडण्याबाबत बॉन्ने तयार होईल या दृष्टीने तू ताबडतोब प्रयत्न कर."

जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारायला एकटा बॉन्नेच खळखळ करीत होता असे नव्हे. फ्रेंच सरसेनानी जनरल गामेलिन यालाही हे युद्ध टळले तर हवे होते. म्हणून तर त्याने दलादिएला सांगितले होते, "एक तर आपल्याला सीमा भागातील नागरी वस्ती अगोदर हलविली पाहिजे. शिवाय सैन्याची जमवाजमव करायलाही आम्हाला

अवधी हवा आहे. त्यामुळे हिटलरला निर्वाणीचा खलिता धाडण्याबाबत घाई करून चालणार नाही."

जर्मनीविरुद्ध युद्ध केव्हा पुकारायचे यासंबंधी ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या दरम्यान विचारविनिमय सुरू असतानाच, इकडे मुसोलिनीने हिटलरला एक पत्र धाडले होते. त्यात त्याने म्हटले होते – "जर्मनीबरोबर वाटाघाटी करायला, ब्रिटन, फ्रान्स आणि पोलंड अजूनही तयार होतील अशी मला आशा वाटते. ही बैठक पूर्वी सुचविल्याप्रमाणे पाच सप्टेंबरला व्हावयाची असेल तर जर्मन सैन्य आणखी आगेकूच करणार नाही असे तुम्ही जाहीर करावे. तुमच्या या घोषणेचा वाटाघाटी सुरू होण्याच्या दृष्टीने फार उपयोग होईल."

दोन दिवसांच्या धुमश्चक्रीनंतर डॅन्झिग बंदर आणि पूर्व प्रशियाला जोडणारा पट्टा जर्मन लष्कराच्या ताब्यात आलेला होता. म्हणजे ज्यासाठी हिटलरने हे आक्रमण आरंभिले होते तो उद्देश सफल झालेला होता. अशा परिस्थितीत हिटलरने युद्धविराम जाहीर केला तर संभाव्य महायुद्ध टाळता येईल अशी या सूचनेमागची मुसोलिनीची भूमिका होती.

हिटलरने उत्तर धाडले, "ब्रिटिश आणि फ्रेंच राजदूतांनी काल जे खलिते आमच्या परराष्ट्रखात्याला सादर केलेले आहेत ते जर अंतिमोत्तराच्या स्वरूपाचे नसतील तर बैठकीच्या सूचनेचा विचार करायला माझी तयारी आहे."

हिटलरचे हे उत्तर आल्यानंतर इटालियन परराष्ट्रमंत्री काऊंट कियानो याने बॉन्ने याला फोन करून हिटलरची अट त्याच्या कानांवर घातली. हिटलर वाटाघाटीला तयार आहे हे कळताच बॉन्ने इतका आनंदला की त्याने लगेच कियानो याला सांगितले, "छे छे, आम्ही जर्मनीला अंतिमोत्तर मुळीच धाडलेलं नाही. तरीपण मी दलादिएला भेटून तुम्हाला कळवितो."

बॉन्ने धावत धावतच दलादिएच्या भेटीला गेला. दलादिए म्हणाला, "ठीक आहे. आपण आणखी एक दिवस थांबू. तेवढ्या वेळात हिटलरनं युद्धविराम जाहीर केला तर आपल्याला निर्वाणीचा खलिता धाडण्याची जरूर पडणार नाही."

दलादिएची संमती मिळाल्यानंतर, ब्रिटनला राजी करणे एवढेच बॉन्नेचे काम उरले होते. म्हणून त्याने हॅलिफॅक्स याला फोन केला. हॅलिफॅक्स म्हणाला, "पोलंडमधून आपलं सैन्य मागं घेण्याचं हिटलरनं आश्वासन दिलं तरच आपण वाटाघाटींना तयार होऊ."

"हिटलरकडून तशी मान्यता मिळणं कठीण आहे," बॉन्ने याने शंका प्रदर्शित केली.

"मग आमचाही नाईलाज आहे," हॅलिफॅक्सने आपला निर्णय कळविला.

हॅलिफॅक्स याने काउंट कियानो यालाही फोन करून आपली भूमिका कथन

केली. तेव्हा कियानो म्हणाला, " पोलंडमधून सैन्य मागं घेण्याची अट हिटलर मान्य करील असं मला वाटत नाही. "

हॅलिफॅक्स याने टेलिफोन खाली ठेवला. वाटाघाटींचा प्रश्न कायमचा निकालात निघाला होता. बॉन्ने खूप हळहळला, पण आता त्याचा काहीही उपयोग नव्हता. हिटलरने विशिष्ट मुदतीच्या आत, पोलंडमधून सैन्य मागे घ्यायला तयारी दर्शविली नाही तर त्याच्याविरुद्ध युद्धाचा पुकारा करणे अपरिहार्य झाले होते.

चेंबर्लेन-मंत्रिमंडळाची अवस्था तर फारच चमत्कारिक झाली होती. फ्रान्सच्या नादी लागून आपल्या सरकारने जर्मनीला अंतिमोत्तर धाडायला उशीर करावा ही गोष्ट ब्रिटिश लोकमताला मंजूर होण्यासारखी नव्हती. त्यामुळे हॅलिफॅक्स याने पुन्हा सर एरिक फिप्स याला फोन करून अंतिमोत्तर धाडण्याबाबत फ्रेंच सरकारची मंजुरी मिळवण्याची विनंती केली.

त्यावेळी फ्रेंच संसदेची बैठक सुरू झालेली होती. सभागृहात गंभीर शांतता पसरली होती. टाळ्यांच्या गजरात दलादिए बोलायला उभा राहिला. तो म्हणाला, " जर जर्मनीनं पोलंडमधून आपलं सैन्य मागं घेतलं तर वाटाघाटींचा मार्ग अद्यापही मोकळा आहे हे मी जाहीर करू इच्छितो. परंतु पोलंडसारखं मित्रराष्ट्र आक्रमकाच्या आघातासरशी नष्ट होत आहे हे आम्ही निमूटपणानं पाहणार नाही हेही तितकच खरं आहे. हे केवळ जर्मनी आणि पोलंड यांच्यातील भांडण आहे काय ? नाही ! युरोपवर आणि पर्यायानं जगावर वर्चस्व स्थापन करण्याच्या महत्त्वाकांक्षेनं खदखदणाऱ्या नाझी हुकूमशहानं टाकलेलं हे पहिलं पाऊल आहे. म्हणून हे आक्रमण

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।
डोंगरे बालामृत
के. टी. डोंगरे अॅण्ड कं. प्रा. लि. मुंबई-१

थोपविणं फ्रान्सचं कर्तव्य आहे – पोलंडला दिलेल्या शब्दाला जागण्यासाठी आणि फ्रान्सचं स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यासाठी."

टाळ्यांच्या गजरात दलादिएने आपले भाषण संपविले. हिटलरविरुद्ध युद्ध पुकारायला फ्रेंच लोकप्रतिनिधींनी संमती दिली होती. तरीदेखील युद्ध टळले तर बरे असेच फ्रेंच सरकारला वाटत होते. आणि त्यामुळे अंतिमोत्तर धाडण्याबाबत अजूनही निर्णय होत नव्हता.

फ्रान्सची ही दिरंगाई चेंबर्लेन याला असह्य झाली होती. म्हणून रात्री दहा वाजता त्याने स्वतःच दलादिए याला फोन केला. चेंबर्लेन म्हणाला, "उद्या दुपारी बारा वाजता जर्मनीला अंतिमोत्तर धाडावे आणि त्यात अठ्ठेचाळीस तासांची मुदत नमूद करावी असा तुमचा विचार असल्याचं मला कळलं आहे. परंतु इतकं थांबायला हाऊस ऑफ कॉमन्सची तयारी नाही. युद्ध सुरू झाल्यानंतर त्याचा पहिला आघात फ्रान्सला सहन करावा लागणार आहे हे मला मान्य आहे. परंतु ब्रिटनमधील आताचं वातावरण असं आहे की मी जर ताबडतोब घोषणा केली नाही तर लोकमत कमालीचं प्रक्षुब्ध होईल. म्हणून मी एक तडजोड सुचवितो. उद्या सकाळी आठ वाजता आपल्या राजदूतांनी जर्मन परराष्ट्रखात्याला अंतिमोत्तर सादर करावं आणि दुपारी बारा वाजेपर्यंत जर जर्मनीकडून सैन्य मागं घेण्याबाबत आश्वासन मिळालं नाही तर आपण दोघांनी युद्धाची घोषणा करायची."

हिटलर अजूनही वाटाघाटींची सूचना मान्य करील अशी बॉन्नेप्रमाणे दलादिए यालाही अजून आशा वाटत होती. त्यामुळे त्याने चेंबर्लेनच्या सूचनेसंबंधी निःसंदिग्ध उत्तर देण्याऐवजी काऊंट कियानो पाच राष्ट्रांच्या बैठकीसंबंधी कसे प्रयत्न करीत आहे याचीच माहिती सांगायला प्रारंभ केला. दलादिए चेंबर्लेनला म्हणाला, "उद्या दुपारपर्यंत आपण गप्प बसावं असं मला वाटतं. फ्रेंच मंत्रिमंडळाचंही तसंच मत आहे. बहुधा तोपर्यंत कियानोच्या प्रयत्नांना यश येऊन हिटलर 'आपण वाटाघाटींना तयार आहोत' असे जाहीर करील. तसं घडलं नाही तर उद्या दुपारी आपण अंतिमोत्तर सादर करू."

एवढे बोलून दलादिएने फोन खाली ठेवला.

अर्ध्या तासाने हॅलिफॅक्सने बॉन्ने याला फोन केला. हॅलिफॅक्स म्हणाला, "उद्या सकाळी आठ वाजता अंतिमोत्तर धाडण्याचा आमचा निर्णय झालेला आहे. फ्रान्सनंही हेच वेळापत्रक मान्य करावं असं आम्हाला वाटतं. परंतु तुमची तयारी झालेली नसेल तर आता आम्ही थांबणार नाही."

बॉन्नेने विचारले, "एवढी घाई करायचं काय कारण आहे? आणखी चार तास थांबलं तर काही बिघडत नाही."

हॅलिफॅक्सने सांगितले, "आम्ही उद्याच्या उद्या युद्धाची घोषणा केली नाही तर आमचं सरकार टिकणं सर्वस्वी अशक्य आहे. ब्रिटिश लोकमत एवढं बिथरलं आहे

की आम्ही स्वस्थ बसलो तर ते आम्हालाच फेकून देईल."

शेवटी असे ठरले की ब्रिटनने सकाळी नऊ वाजता आणि फ्रान्सने दुपारी बारा वाजता जर्मन परराष्ट्रखात्याकडे आपापली अंतिमोत्तरे सादर करावीत.

दुसऱ्या दिवशी म्हणजे तीन सप्टेंबरला सकाळी आठ वाजता बॉन्ने याने दलादिएची भेट घेऊन अंतिमोत्तरात कोणती मुदत घालायची यासंबंधी चर्चा केली. दलादिए म्हणाला, "उद्या सकाळी पाच वाजता आम्ही युद्ध घोषित करू असं आपण अंतिमोत्तरामध्ये म्हणावं."

त्याप्रमाणे बॉन्ने आपल्या परराष्ट्रकचेरीत परतला आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या खलित्याचा मसुदा लिहू लागला. बॉन्ने याने लिहिले—'पोलंडमध्ये घुसविलेले आपले सैन्य जर्मनीने ताबडतोब मागे घेतले पाहिजे अशी आम्ही १ सप्टेंबरला मागणी केलेली आहे आमची ही मागणी सोमवार दि. ४ सप्टेंबर १९३९ च्या सकाळी पाच वाजेपर्यंत मान्य झाली नाही तर फ्रान्स पोलंडच्या मदतीला जाईल'.

या अखेरच्या क्षणीदेखील 'फ्रान्स जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारील' असे शब्द खलित्यात अंतर्भूत करण्याची बॉन्ने याची हिंमत झाली नाही. बॉन्ने याने हा खलिता दोन तीन वेळा वाचला आणि त्यातील प्रत्येक शब्द योग्य आहे अशी खात्री झाल्यानंतर त्याने तो टेलिफोनवरून कोलोन्द्र याला वाचून दाखविला.

तत्पूर्वी नऊ वाजता ब्रिटिश राजदूत सर नेव्हिल हेंडरसन रिबेन्ट्रॉपला अंतिमोत्तर देण्यासाठी जर्मन परराष्ट्र खात्याच्या कचेरीत जाऊन आला होता. परंतु रिबेन्ट्रॉप त्याला भेटला नाही. म्हणून हेंडरसन याने डॉ. पॉल श्मिड्ट याला ब्रिटिश सरकारच्या वतीने अंतिमोत्तर वाचून दाखविले—'पोलंडमधून सैन्य मागे घेण्याबाबत जर आम्हाला आणखी दोन तासांच्या आत जर्मनीकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर ब्रिटन आणि जर्मनी यांच्यात युद्ध सुरू होईल.'

ब्रिटनचा हा खलिता घेऊन डॉ. श्मिड्ट हिटलरला भेटायला गेला. श्मिड्ट याने ब्रिटिश खलित्याचा जर्मन अनुवाद वाचून दाखविताच हिटलरने रिबेन्ट्रॉपला विचारले, "आता काय करायचं?"

रिबेन्ट्रॉप उत्तरला, "आणखी तासाभरात फ्रान्सकडूनही असाच खलिता येईल असा माझा अंदाज आहे."

हिटलर काहीसा अस्वस्थ झाला. पोलंडच्या प्रश्नावरून ब्रिटन आणि फ्रान्स यांच्याशी आपल्याला युद्ध करावे लागेल याची त्याला कल्पना नव्हती.

जर्मनीला सादर करावयाच्या अंतिमोत्तरासंबंधी बॉन्ने याने कोलोन्द्र याला फोन केल्यानंतर लंडनमधल्या फ्रेंच वकिलातीमधून प्रधानमंत्री दलादिए याला फोन आला— "फ्रान्सनं जर्मनीला सोमवार सकाळपर्यंत मुदत द्यावी ही गोष्ट ब्रिटिश सरकारला मुळीच पसंत पडलेली नाही."

ब्रिटनला दुखविणे फ्रान्सला आता परवडण्यासारखे नव्हते. त्यामुळे दलादिए याने जनरल कोल्सन याला बोलावून घेऊन सारी परिस्थिती समजावून सांगितली. दलादिए आणि कोल्सन यांच्या चर्चेमध्ये ही मुदत बारा तासांनी अलीकडे आणण्याचे ठरले. यावेळी साडेअकरा वाजले होते आणि आणखी पंचवीस मिनिटांनी कोलोन्द्र, जर्मन परराष्ट्रखात्यात अंतिमोत्तर सादर करण्यासाठी आपल्या कचेरीतून बाहेर पडणार होता. दलादिए याने बॉन्ने याला तातडीने बोलावून घेऊन आपला निर्णय सांगितला. पावणे बारा वाजता कोलोन्द्रच्या कचेरीतील टेलिफोन खणखणला. बॉन्ने त्याला सांगत होता, " अंतिमोत्तरामध्ये ' उद्या सकाळी पाच वाजता ' असे शब्द आहेत. त्याऐवजी ' आज सायंकाळी पाच वाजता ' असा बदल कर. "

कोलोन्द्र गोंधळला. बॉन्नेचे नाव सांगून दुसरा कोणी तरी हा बनावट निरोप सांगत असावा अशी त्याची कल्पना झाली. म्हणून त्याने विचारले, " कोण बोलतंय ? "

" मी बॉन्ने. "

" मला खरं वाटत नाही. "

बॉन्ने याने शेजारी बसलेल्या लेगेरच्या हातात रिसीव्हर दिला. लेगेरचा आवाज कोलोन्द्रच्या अधिक परिचयाचा होता. त्यामुळे ' आता बॉन्नेच तुझ्याशी बोलला ' असे जेव्हा लेगेरनें सांगितले तेव्हाच कोलोन्द्रची खात्री पटली.

बरोबर बारा वाजता कोलोन्द्र जर्मन परराष्ट्रखात्याच्या कचेरीमध्ये जाऊन पोचला. परंतु रिबेन्ट्रॉप तेथे हजर नव्हता. म्हणून कोलोन्द्र याने तेथे हजर असलेल्या विझसॅकरच्या टेबलावर आपला खलिता ठेवला; परंतु तो स्वीकारायला विझसॅकर याने नकार दिला. त्यामुळे काय करावे हे कोलोन्द्र याला प्रथम उमजेना. रिबेन्ट्रॉप हिटलरला भेटायला गेलेला आहे हे विझसॅकरकडून कळताच कोलोन्द्र हिटलरच्या कचेरीमध्ये गेला.

कोलोन्द्र कशासाठी आलेला आहे हे रिबेन्ट्रॉपला माहीत होते. तरीही तो कोलोन्द्रला म्हणाला, " पोलंडसंबंधी पाच राष्ट्रांनी वाटाघाटी कराव्यात ही मुसोलिनीची सूचना आम्हाला मान्य असल्याचं कालच आम्ही रोमला कळविलं होतं. फ्रान्सलाही ही सूचना मंजूर असल्याचं त्यावेळी आम्हाला मुसोलिनीकडून सांगण्यात आलं. परंतु ब्रिटननं विरोध केल्यामुळे आपला निरुपाय झाल्याचा मुसोलिनीकडून नुकताच निरोप आलेला आहे. ते काहीही असलं तरी फ्रान्ससंबंधी आमच्या मनात शत्रुत्वाची भावना नाही. त्यामुळे फ्रान्सनं जर आमच्यावर हल्ला चढविला तरच आम्हाला फ्रान्सशी लढावं लागेल. म्हणून म्हणतो की फ्रान्सनं ब्रिटनच्या तंत्रानं वागायचं काहीच कारण नाही. "

या युक्तिवादाचा आता काहीही उपयोग नव्हता. त्यामुळे कोलोन्द्र याने विचारले, " पोलंडमधून आपलं सैन्य मागं घ्यायला जर्मनीची तयारी नाही असाच या साऱ्या

बोलण्याचा अर्थ आहे ना ?"

"होय."

"तर मग आज संध्याकाळी पाच वाजल्यापासून फ्रान्सला पोलंडबाबतचं आपलं कर्तव्य पार पाडावं लागेल."

"म्हणजे फ्रान्स आमच्यावर युद्ध लादणार असंच ना ?"

"कोण कोणावर युद्ध लादतो आहे हे इतिहासच ठरवील," एवढे बोलून फोलेन्द्र तेथून बाहेर पडला.

पंचवीस वर्षानंतर पुन्हा फ्रान्स आणि जर्मनी यांच्यात युद्धाचा भडका उडाला. परंतु १९१४ मधील उत्साह यावेळी फ्रान्समध्ये मुळीच दिसत नव्हता. कारण नाझी जर्मनीशी लढणे उजव्या गटांना मंजूर नव्हते. तर डाव्या गटांना जर्मनीशीच काय पण कोणाशीही लढाई करणे पाप वाटत होते. युद्धाचे आव्हान स्वीकारणे आपल्याला झेपणार नाही असे प्रधानमंत्र्यापासून सर्वसामान्य नागरिकापर्यंत प्रत्येकाला वाटत होते. सरसेनानीपासून साध्या सैनिकापर्यंत कोणापाशीच लढण्याची उभारी नव्हती. जर्मनीच्या लष्करी तयारीचे बेसुमार गोडवे गाण्यातच जो तो धन्यता मानीत होता आणि युद्धाचा पुकारा केल्याबद्दल आपल्या सरकारवर शिव्याशापांचा वर्षाव करीत होता.

युद्धाची दगदग आपल्याला सोसणार नाही हे सुखासीन पॅरिसला पक्के ठाऊक होते.


(क्रमश:)

पुढील लेखांक : शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर अंक


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)



## समाजवादी दृष्टिकोनातून सामाजिक समस्यांचा विचार

श्री. मा. भावे

श्री. दि. के. बेडेकर यांनी १९३८ सालापासून १९६९ पर्यंत लिहिलेल्या २२ लेखांचा हा संग्रह आहे. मार्क्सवाद, भारतातील साम्यवादी व समाजवादी चळवळ, सोव्हिएत युनियन, प्राचीन संस्कृती व इतिहास आणि इतर विषय यावर केलेले हे लिखाण आहे.

पुस्तकाचे संपादन अतिशय गलथानपणाने केले आहे. लेख विषयवारीने जुळविलेले नाहीत की लेखनक्रमानेही लावलेले नाहीत. पुस्तकाच्या पहिल्या भागात 'समाजवादी दृष्टी ठेऊन केलेले लेखन आहे' तर दुसऱ्यात 'सामाजिक समस्यांचा विचार आहे,' असे प्रस्तावनेत म्हटले आहे. परंतु ते फारच ठोकळमानाने खरे आहे. कारण दुसऱ्या भागात 'आपली परंपरा : भारतीय की वैदिक ?' व 'बळीराजाचे व्यथित मानस' हे प्राचीन इतिहासावरील लेखही समाविष्ट आहेत.

लेखनक्रमानुसार लेख लावले असते तर लेखकाच्या वैचारिक प्रगतीचा आलेख पहावयास मिळाला असता. परंतु तसे नसल्याने येथे चर्चिलेल्या विषयांचाच विचार केला आहे. स्थळमर्यादा लक्षात घेता प्रस्तुत परीक्षणात मार्क्सवादावरील लेख व भारतीय समाजवादावरील विचार यांचीच चर्चा करता येईल.

प्राचीन इतिहासावरील सर्वच लेख अत्यंत वाचनीय असून अभ्यासपूर्ण आहेत. सोव्हिएट युनियनवरील बरेचसे लेख कालबाह्य आहेत. श्री. बेडेकर कम्युनिस्ट कार्यकर्ते असताना हे लेख (लेनिनग्राद–रिगा–मास्को हा लेख वगळता) लिहिलेले असल्याने आंधळ्या कौतुकाने भरलेले

आहेत. स्टालीनच्या राजवटीखालील रशियावर लिहिलेल्या या लेखांतून रशियातील व्यक्तिस्वातंत्र्य, लेखन-स्वातंत्र्य, स्वायत्तता यांची स्तुती वाचताना आता कोणासही हसूच येईल.

मार्क्सवादाच्या फक्त काही भागांचाच विचार या पुस्तकातील लेखात केला आहे. हे लेख वाचताना अशी समजूत होते की 'परात्मता' हा शब्द सुचल्यानेच केवळ हे लेख लिहिले आहेत, कारण इतकी त्या शब्दाची पुनरुक्ती व विवेचन झाले आहे.

मार्क्सला अभिप्रेत असलेले समाजपरिवर्तन मनुष्याची परात्मतेपासून मुक्ती करण्यासाठी आहे. (परात्मता म्हणजे alienation). सत्ता, संपत्ती, दैवते या कल्पना मनुष्याच्या मनातून निर्माण झाल्या व तो त्यांच्या आहारी गेला. परिणामतः तो मानवतेला विसरला व त्यातून मनुष्याची दुःखे निर्माण झाली. मार्क्सवादी समाजपरिवर्तन मनुष्याला मानवतेचा एका उच्च पातळीवरून परत लाभ करून देण्यासाठी आहे. प्रस्थापित समाजरचनेत ज्याचे हितसंबंध गुंतलेले नाहीत असा शहरी कामगारवर्गच असे समाजपरिवर्तन घडवून आणील.

श्री. बेडेकरांनी मार्क्सवादी समाजपरिवर्तनाचे केलेले हे विवेचन मान्य होण्याजोगे असले तरी त्यात काही मुद्द्यांचा विचार आलेला नाही. बेडेकरांचे लिखाण स्पष्टीकरणापर्यंत येऊन थांबले आहे. परीक्षणाची पायरी त्याने गाठलेली नाही. त्यामुळे काही महत्त्वाचे प्रश्न त्यांनी उपस्थितच केलेले नाहीत. ('साम्ययोग'च्या संपादकांचे काही विचार या पुस्तकात छापले आहेत त्यात याच दोषावर परोक्ष रीतीने बोट ठेवले आहे.)

मार्क्सवादाचा विचार करताना समाजपरिवर्तनाच्या उद्दिष्टांबरोबरच साधनांचा विचारही करणे महत्त्वाचे आहे. परिवर्तनाचा चालक हा शहरी कामगारवर्ग. परंतु हा कामगारवर्ग क्रांतिकारक राहिला नाही, प्रस्थापित समाजरचनेत त्याचेही हितसंबंध निर्माण झाले, तर समाजपरिवर्तन कसे होणार? त्याचप्रमाणे समाजपरिवर्तन झाल्यानंतर पुरेशी समृद्धी निर्माण होईपर्यंत कामगारांची हुकूमशाही चालत राहील असे मार्क्स म्हणतो. ही हुकूमशाही नाहीशी होणे शक्य असेल का व ती हुकूमशाही कोण नाहीशी करील? या व इतर प्रश्नांचा विचार होणे अगत्याचे होते. हे न झाल्याने मार्क्सवादाचा विचार तात्त्विक पातळीवरच राहिला आहे. प्रत्यक्षात येणारे हे तत्त्वज्ञान आहे या महत्त्वाच्या गोष्टीला दुय्यम स्थान मिळाले आहे.

श्री. बेडेकर १९५० सालपर्यंत कम्युनिस्ट पक्षात होते. त्यामुळे कम्युनिस्ट असताना त्यांनी लिहिलेले लेख पक्षीय दृष्टिकोनातून लिहिलेले आणि एकांगी आहेत. 'महाराष्ट्रातील समाजवादी विचार' हा लेख मात्र समतोल व मार्मिक आहे.. महाराष्ट्रातील समाजवादी चळवळ क्षीण, असंघटित व शहरी राहण्याची

तीन कारणे बेडेकरांनी सांगितली आहेत. १. समाजवादी विचार व कार्यपद्धती येथे परकीयच राहिली. २. निवडणुकांच्या राजकारणापुढे कामगारांचे व खेड्यांतील शोषितांचे संघटन यांना समाजवादी पक्षांनी दुय्यम मानले. ३. समाजवादी तत्त्वांचा केवळ आर्थिक संदर्भात प्रसार होत राहिल्याने वैचारिक मतपरिवर्तनाची बाजू लंगडी पडली.

याबाबतीत आणखी एका मुद्द्याचा विचार जेवढा पाहिजे तितका अजून केला गेला नाही. समाजवाद्यांनी प्रस्थापित समाजरचनेच्या अस्तित्वाचे मूळ कारण शोधण्याचा नीट प्रयत्नच केला नाही. प्राथमिक अर्थव्यवस्थेत समाजाच्या प्रत्येक घटकाला शक्यतितके समाधान मिळण्याची सोय हिंदू समाजव्यवस्थेत असल्याने हा समाज जसाच्या तसा टिकू शकला. अर्थव्यवस्थेत परिणामकारक बदल होऊन तो बदल ग्रामीण जनतेस जाणवू लागला तरच समाजवादी विचारांना जोर येईल.

दानत व ध्येयवाद नष्ट होणे हा समाजवादी आंदोलनाच्या दृष्टीने सर्वांत मोठा धोका आहे, असे बेडेकर म्हणतात. समाजवाद्यांनी आपल्यातील दानत व ध्येयवाद टिकविणे हे महत्त्वाचे आहेच. पण आपल्या राजकारणाने इतरांची दानत नाहीशी होणार नाही याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वर्तमान समाजवाद्यांनी, विचार करण्याची संवय व वेळ असल्यास, या इशाऱ्याची दखल घ्यावी.

समाजचिंतन : दि. के. बेडेकर : पॉप्युलर प्रकाशन : किंमत १० रु.

---


# शिलंगणाचं सोनं


## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन


---




अॅडव्होकेट
माधव
कानिटकर

लेखांक
पाच

२५ जून १९५७! अंबाला येथील सेशन्स जज्ज न्यायमूर्ती बेदी यांचे कोर्ट. सकाळचे १० वाजत होते. आत्तापासूनच कोर्टात शिरण्यासाठी लोकांची रांग लागली होती. हवालदार शिस्तीत प्रत्येकाला समजावून सांगत होते 'आतमध्ये बडबड करायची नाही, हे सेशन्सकोर्ट आहे!' १०॥ वाजताच कोर्ट तुडुंब भरून गेले. ज्यांना जागा मिळाली नाही ते व्हरांड्यात उभे राह्यले. बंदोबस्ताचा पोलीस अधिकारी पुढे आला. हातातला दांडका फिरवीत त्याने लोकांना समजावले, 'गडबड करू नका. थोड्या वेळाने आतले थोडे थोडे लोक बाहेर काढून मी तुम्हाला आत सोडीन. अर्धा तास बसा आणि हवालदार सांगेल तेव्हा गपचूप बाहेर या. बाकीच्यांना पण खटला ऐकायचाय.' लोकांना ही व्यवस्था आवडली. थांबावं लागेल पण दरोडेखोर बघायला मिळतील. लोक झुंडींनी बाहेरच थांबले.

पावणे अकरा झाले. रूरा, मुला, जगजितसिंग, आणि ग्यानसिंग चौघांना कडक बंदोबस्तात कोर्टात आणले गेले. ग्यानसिंगला अजून जामीन दिला गेला नव्हता. माफीचा साक्षीदार या नात्याने त्याने प्रामाणिकपणे साक्ष दिली नसती तर तो आरोपीच होता. शिक्षा ? कोर्ट देईल ती ! लोक माना वर करून, एकमेकांच्या खांद्यावरून वाकून दरोडेखोर पहात होते. त्यांची कुजबूज चालू झाली. 'दिसतायतच बदमाश ! असल्यांना ना ? चौकशी न करताच पब्लिकच्या हातात द्यायला पाहिजे.'

'काय बोलता राव ! सगळेच एका माळेचे मणी. दारूचे गुत्ते चालू आहेत, मटका चालू आहे, गुन्हा घडला तर कधीकधी वाटेल त्याला धरून आणतात. हवालदाराला पट्टा आणि इन्स्पेक्टरच्या खांद्यावर स्टार असतात म्हणून काही बोलता येत नाही. हे काय राज्य आहे सालं ? कोर्ट आहेत म्हणूनच ठीक आहे.'

सरकारी वकील आणि आरोपींचे वकील दोघेही एकदमच एकमेकांशी बोलत कोर्टात आले. बंदोबस्ताच्या हवालदाराने त्यांना कडक सलाम ठोकून आत यायला वाट काढून दिली होती. दोघांनी जाडजूड पुस्तकं बरोबर आणली होती. लोकांची उत्सुकता वाढली. आता बरोबर ११ वाजले होते. कोर्टाचा शिपाई पुढे आणि सेशन्स जज्ज न्यायमूर्ती बेदी मागे ! शिपायाने लोकांना आवाज दिला, 'सायले ऽ ऽ न्स.' हवालदार ओरडले, 'चू ऽ ऽ प !' वकील मंडळी, आरोपी आणि लोक उभे राहिले आणि कोर्ट बसल्यावर ते खाली बसले. ज्युडिशियल क्लार्कने केस पुकारली.

'स्टेट व्हर्सेस रूरासिंग अँड अदर्स'

सरकारी वकील ताडकन उभे राहिले. त्यांनी केस काय आहे, तिची पार्श्वभूमी कशी आहे, आपण एकूण किती साक्षीदार तपासणार आहोत, ते काय काय सांगतील ते कोर्टाला थोडक्यात सांगितलं. न्यायमूर्ती बेदींनी पुढे झुकून विचारलं, 'आरोपीचे वकील कोण आहेत ?' 'मी आहे साहेब. आय अॅम फायलिंग माय अॅपिअरन्स !'

'फॉर ऑल दी अॅक्युस्ड ?'

'यस् युवर ऑनर !'

... आणि सरकारी वकिलांनी केस ओपन केली ! सुरुवातीलाच त्यांनी हुकमाचा एक्का काढला ग्यानसिंग ! डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी त्याला माफी दिलेली आहे त्यासंबंधीचे कागदपत्र त्यांनी कोर्टाला दाखल केले. आणि ग्यानसिंग पिंजऱ्यात आला

न्यायमूर्ती बेदींनी त्याला नी ऽ ऽ ट समजावला, 'हे बघ ग्यानसिंग ! तू आधी आरोपी आहेस आणि नंतर माफीचा साक्षीदार. जर का खोटी साक्ष दिलीस तर तुझी माफी मी रद्द करीन आणि तुझ्यावर पण केस चालेल. तू खरं बोलणार ना ?'

'होय साहेब मी खरं बोलणार !

दोघेही वकील खूष झाले. सरकारी वकिलांना वाटलं हा खरं बोलणार, तर

बचावाच्या वकिलांना वाटलं हा जेवढा खरं बोलेल तेवढं बरं! माझा बचाव भक्कम करील. हा कसला प्रॉसिक्यूशन विटनेस? हा तर डिफेन्स विटनेसच आहे!

आणि केसला सुरुवात झाली!

'ग्यानसिंग! म्हण देवा शप्पथ खरं सांगेन, सगळं खरं सांगेन आणि खऱ्या शिवाय दुसरं काही सांगणार नाही! (I will tell the truth, the whole truth and nothing but the truth!)

'तू हे ऽऽ जे आरोपी बसल्येत ना? त्यांना ओळखतोस?'

'हो ओळखतो!'

'कसे ओळखतोस?'

'हा रूरा आणि मी आम्ही मूळचे जालंदरचे. आमची घरं शेजारी शेजारी होती. लहानपणी शाळेत आम्ही एकत्र शिकलो. शाळेत आम्ही इतर मुलांची पुस्तकं चोरून विकायचो!'

'अस्सं! मग पुढे?'

'पुढे आम्ही शाळा सोडली आणि एकत्र येऊन चोऱ्या करायला लागलो!'

'कधी शिक्षा लागली होती?'

'५ वेळा. त्याला पण नि मला पण.'

सरकारी वकिलांनी रूराचे आणि ग्यानसिंगचे ५ दाखले कोर्टाला सादर केले.

'आता सांग शेवटची शिक्षा कधी लागली.

'२ फेब्रुवारी १९५६ ला.'

'किती शिक्षा लागली होती?'

'१ वर्ष सक्त मजुरी, २०० रुपये दंड नाही तर आणखी एक महिना!'

'कुणा कुणाला शिक्षा लागली?'

'मला आणि रूराला...आम्ही दोघं आरोपी होतो!'

'जेलमध्ये तुझं आणि रूराचं काही बोलणं व्हायचं?'

... आता मात्र बचावाचे वकील ताडकन उभे राह्यले आणि ओरडले, 'आय-ऑबजेक्ट युवर ऑनर! माय लर्नेड फ्रेंड इज लीडींग हीम!'

न्यायमूर्ती बेदींनी डोळे बारीक करीत म्हटलं, 'यऽऽस् ऑबजेक्शन सस्टेंड!'

सरकारी वकील अडकले, गोंधळले आणि सावरले! त्यांनी रस्ता काढला. त्यांनी पुढचा प्रश्न टाकला–

'ग्यानसिंग! तू, मुला आणि जगजितसिंगला कसा ओळखतोस?'

'त्याचं असं झालं साहेब. जेलमध्ये रूरा मला नेहमी सांगायचा...'

कोर्टात प्रचंड हशा पिकला. सरकारी वकिलांनी बचावाच्या वकिलाकडे कुत्सितपणाने पाहृयलं. त्याचा भावार्थ असा होता– 'आता तर काही ऑब्जेक्शन नाही ना? तोच बोलतोय! मी त्याला मार्गदर्शन करीत नाही.'

आपला काळा झगा फडकावित सरकारी वकील झटकन वळले आणि त्यांनी विचारलं,

'हाँऽऽऽ! काय सांगायचा तुला रूरा नेहमी जेलमध्ये ?'

'तो सांगायचा की ग्यानसिंग! सालं प्रायव्हेट चोऱ्या करून फायदा नाही, सजा लागते!' (कोर्टात हशा)

'मग ?'

'मग काय ? रूरा म्हणाला आता बँकेवरच दरोडा मारू! पुढची ५-१० वर्षं बघायला नको!' (लोकात खळबळ)

'मग पुढे काय झालं ?'

'आम्ही २५ मार्च १९५७ ला सुटलो. नंतर रूराने जगजितसिंगची आणि माझी ओळख करून दिली!'

'कुठे ?'

'जगजितसिंगच्या घरी.'

'काय बोलणं झालं ?'

'जगजितसिंग म्हणाला, 'ठरलं! पंजाब नॅशनल बँक लुटायची. तुम्ही काळजी करू नका. मुख्यमंत्री सरदार प्रतापसिंग कैरों माझे सख्खे काका आहेत. पुढे काही झालं तर ते पटवतील!'

'मग पुढे काय झालं!'

'२९ मार्च १९५७ ला दुसरी मिटींग झाली.'

'तेव्हा तिथे कोण कोण होते ?'

'मी होतो! हे तिघे होते, शिवाय मोहनसिंग, चरणसिंग, फकिरा आणि सुरिंदरसिंग होते.'

'मग काय ठरलं त्या मिटींगमध्ये ?'

'जगजितसिंग म्हणाला, १ एप्रिल १९५७ ला रात्री दरोडा घालू या! पहिल्या आठवड्यात बँकेत जाम पैसे असतात. पण काम अकलेनी करा. आधी पोलिसांना लॉकअपमध्ये टाकू आणि मग बँक सावकाश लुटू!'

'पुढे काय झालं ?'

'ठरल्याप्रमाणे मी, हे तिघं आणि ते चौघं असे आठजण आधी मुकेरियन पोलीस स्टेशनवर गेलो. भिंतीला फळी लावून आम्ही सातजण पोलीस स्टेशनच्या छपरावर चढलो. फकीरा मुख्य दरवाजातून सरळ आला. त्याचं आणि पहारेकरी संतरामचं भांडण झालं. तेवढ्यात हेड्कॉन्स्टेबल निर्भयसिंग धावत आला. आम्ही वरून गोळीबार सुरू केला. निर्भयसिंगाला गोळी लागली आणि तो मेला. एक गोळी संतरामला लागली. नंतर आम्ही हवालदारांना तुरुंगात बंद केले.'

'त्यावेळी तुरुंगात कुणी होता ?'

'एक आरोपी होता !'

सरकारी वकील पुन्हा डौलात वळले आणि ओरडले, 'हवालदार ! त्या लाल मशीला आत बोलवा !' हवालदार ओरडत सुटले –

'लाल मशीऽऽ!'

लाल मशी आत आला. सरकारी वकिलांनी ग्यानसिंगला विचारलं,

'तो जो आतमध्ये आरोपी होता म्हणतोस तो आता इथे आहे कुठे ?'

आणि ग्यानसिंगने लाल मशीकडे बोट दाखवीत म्हटले, 'हा होता !'

सरकारी वकिलांनी लाल मशीच्या खांद्यावर थोपटत त्याला सांगितलं, 'आता तू बाहेर जा ! मी बोलावीन तेव्हा ये हांऽऽऽ!'

लाल मशी गोंधळला. सेशन्स कोर्टात तो प्रथमच साक्ष द्यायला आला होता. त्याला कळेना हा काय प्रकार आहे ? नवऱ्या मुलाला मुलगी दाखवतात तसा नुसताच मला दाखवला ! पुन्हा बाहेर जा, नंतर ये. काय कायदा आहे !

...पण सरकारी वकील बरोबर होते. एकाची साक्ष चालू असताना बाकीच्या साक्षीदारांनी बाहेर जायचं असतं. सरकारी वकिलांनी लाल मशी बाहेर गेल्यावर पुन्हा ग्यानसिंगला विचारलं,

'मग पुढे तुम्ही कांय केलंत ?'

'नंतर आम्ही पोलीस स्टेशनवरची काडतुसं, रिव्हॉल्व्हर्स, बंदुका आणि कॅश चोरली आणि पंजाब नॅशनल बँकेवर गेलो. जगजितसिंग म्हणाला, आता वेळ काढू नका, गुरख्याला सरळ गोळी घाला आणि आपलं काम करा...

(कोर्टात प्रचंड खळबळ)

...आम्ही बँकेच्या गुरख्याला गोळी घातली आणि बँकेची तिजोरी फोडायचा प्रयत्न केला, पण ती फुटेना ! इतक्यात बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज झाला. जगजितसिंग ओरडला, 'चला ! फुटा इथून ! पोलीस आले बहुतेक.' म्हणून आम्ही पळालो. बस स्टँडवर गेलो. तिथे एक रिकामी बस उभी होती. ड्रायव्हरला पिस्तुल दाखवून त्याला जबरदस्तीने आम्ही ४ मैल बस चालवायला लावली. नंतर दम देऊन त्याला उतरवला आणि जगजितसिंग स्वतः बस चालवायला बसला. त्याने बस आणखी ५–६ मैल पळवली आणि नंतर ती बस सोडून देऊन आम्ही आपापल्या गावी चालत गेलो.'


'नंतर तुला पोलिसांनी पकडला ?'

'होय !'

'आणि तू डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटसमोर माफीचा साक्षीदार व्हायला कबूल झालास हे बरोबर ना ?'

'बरोबर आहे !'

'हा अर्ज आणि हे तुझं स्टेटमेंट यांच्यावर ही सही तुझीच आहे ना ?'



या अर्जावरची सही तुझीच आहे ना ?

'माझीच आहे !'

सरकारी वकील खूष झाले. ग्यानसिंग खरोखरच खरं बोलला ! पण खरी जुगलबंदी आता होती. न्यायमूर्ती बेदींनी आरोपीच्या वकिलांना हुकूम दिला, 'यस् ! क्रॉस !'

आरोपीचे वकील आत्मविश्वासाने उभे राहिले. त्यांनी पहिलाच गुगलीबॉल टाकला.

'ग्यानसिंग ! डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटसमोर तू एकूण किती वेळा गेलास ?'

'दोनदा !'

'अगदी बरोबर ! दोनदा का गेलास ?'

'पहिल्या वेळेला मी काही बोललोच नाही.'

'बरोबर ! आणि तू साहेबांना असंही सांगितलंस की हा अर्ज मी द्यायला तयार नव्हतो, पोलिसांनी तो माझ्याकडून लिहून घेतला. हे खरं ना ?'

'खरं आहे पण...'

'पण बिण मला काही नको! मी विचारतो ते खरं का खोटं एवढं बोल.'

सरकारी वकील रागारागानें उभे राहले. त्यांनी तक्रार केली, 'युवर ऑनर! साक्षीदार पूर्ण उत्तर देण्यापूर्वीच माझे वकील मित्र त्याला दम देताहेत.'

आरोपीच्या वकिलांनी कागदपत्र टेबलावर आपटले आणि सरकारी वकिलांवर ते गुरकावले,

'मिस्टर प्रॉसिक्युटर! ही इज अंडर क्रॉस. आत्ता मला डिस्टर्ब करू नका. उलट तपासणी कशी घ्यायची ते मला समजतं. मी त्याला कारण विचारलंच नव्हतं. फक्त खरं का खोटं एवढंच विचारलं होतं.'

न्यायमूर्ती बेदींनी दोघांना थंड केले. सरकारी वकिलांना त्यांनी सुनावले, 'प्रॉसिक्युटर! उगाच डोकं तापवून घेऊ नका. अशा वेळी काय करायचं ते तुम्हाला समजलं पाहिजे. मी सांगणार नाही.'

...सरकारी वकील काय ते समजले! उलटतपासणी पुढे सुरू झाली.

'आताऽऽ हे बघ ग्यानसिंग! तुला इंग्रजी येतं?'

'नाही साहेब!'

'अरे! पण अर्ज तर इंग्रजीत आहे!'

'तो साहेबांनी लिहिला आणि टाईप केला!'

'कुठल्या साहेबांनी?'

'सब-इन्स्पेक्टर शिवप्रसादनी.'

'अस्सं! युवर ऑनर! जरा ह्याची नोंद व्हावी!'

न्यायमूर्ती बेदींनी मान हलवली आणि टायपिस्टकडे पाहलं. ग्यानसिंगचं वाक्य टाइप झालं....I say that the application for pardon, submitted by me to the Learned District Magistrate, was drafted, written, and typed by Sub-Inspector Shivprasad!

'आता हे बघ ग्यानसिंग, हा गुन्हा केल्यानंतर तू आपण होऊन पोलीस स्टेशन-वर गेलास का तुला नंतर पकडला?'

'मला नंतर पकडला!'

'मॅजिस्ट्रेट साहेबांसमोर तू जो दुसरा अर्ज दिलास त्यात तू असं म्हणालास की गुन्हा केल्यानंतर मला पश्चात्ताप झाला! मग तू लगेच पोलीस स्टेशनवर आपणहून का नाही गेलास?'

'तेव्हा मला माहीत नव्हतं की या गुन्ह्याला फाशीची शिक्षा आहे ते!'

'केव्हा कळलं तुला ते?'

'पोलिसांनी सांगितलं तेव्हा!'

'अस्स! म्हणजे हे बरोबर ना की पोलिसांनी तुला सांगितलं की फाशी जाशील त्यापेक्षा सांगतो तसं कर!'

'बरोबर!'

...सरकारी वकिलांनी कपाळाला हात लावला. त्यांचा आघाडीचा फलंदाज आऊट झाला होता!

खाली बसता बसता आरोपींच्या वकिलांनी ध्यानसिंगला सांगितलं, 'हे बघ! माझं म्हणणं असं आहे. गुन्हा करूनच्या करून वर आपला जीव वाचवावा म्हणून तू खोटं बोलतो'स. जगजितसिंग, रूरा आणि मुला त्या दरोड्यात नव्हतेच!

त्यानंतर आत आला लाल मशी! आरोपींना आपण गुन्हा करताना प्रत्यक्ष पाहिल्याचं त्याने सांगितलं. बचावाच्या वकिलांनी त्यालाही उडवून दिला!

'हे बघ लाल मशी! तू होतास जेलमध्ये आणि ते (!) दरोडेखोर होते वर म्हणजे सुरवातीला तू काही कुणाला पाहिलं नाहीस!

'नाही! पण नंतर सगळे खाली आले!'

'किती वेळ होते तिथे?'

'अर्धा तास!'

'म्हणजे आठ जणांना तू फक्त अर्धा तास पाहिलेस!'

'वेळ कितीची होती?'

'रात्री १२॥–१ ची!'

'तुरुंगात दिवा आहे?'

'नाही!'

'सकाळी साहेबांनी तुझं स्टेटमेंट किती वाजता घेतलं!'

'९–९॥ ला.'

'मग तेव्हा तू साहेबांना आठी आठ जणांचं वर्णन दिलं असशीलच!'

'नाही दिलं! मी फक्त एवढं सांगितलं की मी सगळ्यांना ओळखू शकेन.'

'आता हे बघ हा मुला आहे ना? त्याच्या तोंडावर देवीचे वण आहेत. साहेबांना तू असं बोललास का की त्यात कोणीतरी एक तोंडावर देवीचे वण असलेला होताऽऽऽ! बोललास?'

'नाही.'

'तो फकीरा म्हणून दरोडेखोर होता तो तर एका पायानें लंगडा होता. तू असं साहेबांना सांगितलंस का की त्यांच्यात एक लंगडा होताऽऽऽ! सांगितलंस?'

'नाही!'

'आता हा बघ जगजितसिंग! त्याचा एक हात लुळा आहे. तू साहेबांना सांगितलंस का की त्यांच्यातला एक माणूस एकाच हातानी काम करीत होताऽऽऽ! सांगितलंस?'

'नाही!'

'बरं तुझ्यावर केस होती तिचं काय झालं?'

'पोलिसांनी ती काढून घेतली.'

'बरोब्बर! आता कसं खरं बोललास. माझं म्हणणं असं आहे, पोलिसांनी तुझ्यावर केस केली नाही म्हणून तू त्यांना मदत करतोयस आणि खोटी साक्ष देण्यासाठी आलास! तू काही रूरा, मुला आणि जगजितसिंगाला पाहिलेलं नाहीस; कारण ते तिथे नव्हतेच!'

आरोपींच्या वकिलाच्या बुद्धिमत्तेची तारीफ होत होती. दररोज तारखा पडत होत्या. आता मात्र सरकारी वकील सावरले. आरोपी सुटले तर पंजाब पोलीसांची अब्रूच नव्हे तर ग्यानसिंग आणि लाल मशी यांचे जीवही गेले असते! 'साक्ष देता काय! बघतो आता तुम्हाला' असाच विचार आरोपी करणार होते!

सरकारी वकिलांनी कसून मेहनत घेतली. फिंगर प्रिंट एक्सपर्ट, डॉ. बालकृष्ण, बसचा ड्रायव्हर, संताराम, १५ हवालदार, पंच, दूधवाला मोतासिंग, शास्त्रास्त्र तज्ज्ञ, आणि गुन्हा घडण्यापूर्वी आरोपी कुठे होते, त्यांचे संबंध कसे आले हे सांगणारे एकूण १६५ साक्षीदार त्यांनी नीट तपासले तर बचावपक्षाने २९ साक्षीदार तपासले.

उलट सुलट पुराव्याचा डोंगर जमा झाला. आता खटला संपला होता. उरली होती फक्त वकिलांची भाषणं आणि जज्मेंट.

...न्यायमूर्ती बेदींनी वकिलांच्या भाषणासाठी तारीख दिली ५ जुलै १९५७!

(क्रमशः)

---

## खुलासा

१९५७ मुकेरियन पंजाब नॅशनल बँक या माझ्या कथामालेतील लेखांक चारमध्ये (बुधवार, ७ ऑक्टोबर १९७०) पृष्ठ ४० वर पंजाब पोलिसांसंबंधी 'हे बघा ऽऽ! तुम्ही आहात पोलीस! डोक्याचा भाग जरा कमीच असतो तुम्हाला' असे सरकारी वकीलाच्या तोंडी आलेले एक वाक्य आहे. यामुळे पंजाब पोलिसांच्या भावना दुखावल्या जाण्याची शक्यता आहे. पंजाब पोलीस माझे मराठीतील हे स्वैर रूपांतर वाचण्याची शक्यता तशी कमीच. तरीपण अनवधानाने झालेली चूक दुरुस्त व्हावी असे मला वाटते. यास्तव हा खुलासा व सोबत दिलगिरीही.

ॲड. माधव कानिटकर

---

विज्ञानधारा

डॉ. नरेंद्र दाभोळकर

# विक्रमी विजयाचे विज्ञान

एका ऑलंपिकचे विक्रम हे दुसऱ्या ऑलंपिकला बहुधा उल्लखिले जातात. ऑलंपिकच्या यशाची ही अखंड परंपरा आहे. अशक्य वाटणारे उच्चांक प्रस्थापित होतात आणि आश्चर्य वाटावे इतक्या सहजतेने ते मोडले जातात.

जिद्द, प्रयत्न, सराव व शास्त्र या साऱ्यांच्या साहाय्याने ही घोडदौड चालू आहे. एका विशिष्ट उच्चांकानंतर पुढे प्रगती अशक्य आहे हे सारे अंदाज जगज्जेत्या वीरांनी आपल्या कर्तृत्वाने खोटे ठरविले आहेत. म्हणूनच खेळाडू किती वेगाने पळू शकेल याला मर्यादा आहे की नाही ? असे प्रश्न कुतुहलाने विचारले जातात.

—या प्रश्नाचे वैज्ञानिक स्वरूप असे आहे.

आपल्या प्रत्येकाच्या प्रत्येक पेशीमध्ये, स्नायूमध्ये कार्य करण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी प्राणवायू वापरला जातो. ज्यावेळी या प्राणवायूचा शरिरातील साखर (ग्लुकोज) वा इतर इंधनाशी संयोग होतो त्यावेळी ही शक्ती तयार होते. एखादा माणूस अधिकाधिक किती वेगाने पळू शकेल याचे एक उत्तर त्यामुळे सरळच मिळते—तो ज्या प्रमाणात प्राणवायू शरिरात घेऊ शकेल आणि उपयोगात आणू शकेल त्या-प्रमाणात.

हे वाटते तेवढे सोपे सरळ नाही.

समजा एक मैल धावण्याच्या शर्यतीत भाग घेण्यापूर्वी काही मिनिटे एखादा विक्रम-वीर हिरवळीवर विश्रांती घेत आहे. यावेळी प्रत्येक मिनिटाला सहा ते आठ लीटर हवा अथवा एक ते दीड लीटर प्राणवायू त्याला श्वासोच्छ्वासास लागतो. हा प्राण-वायू फुफ्फुसाच्या वायुकोशामधून त्या खेळाडूच्या रक्तात शिरतो. प्रत्येक रक्तपेशीत असलेल्या हिमोग्लोबीन या द्रव्याशी त्याचा संयोग होतो. त्याला ऑक्सी हिमोग्लो-बीन (Oxiy hemoglobin) म्हणतात. हृदयाच्यामार्फत करविल्या जाणाऱ्या रक्ताभिसरणामुळे तो पेशीकडे वाहून नेला जातो आणि त्याचे विघटन होऊन त्यातील प्राणवायू पेशी वापरतात. हे सगळे खरे असते खेळाडू विश्रांती घेत असताना.

बंदुकीतून गोळी सुटावी त्याप्रमाणे इशाऱ्यावर खेळाडू स्पर्धेची सुरुवात करतो आणि सारीच परिस्थिती बदलते. दोन बदल प्रामुख्याने घडून येतात. एक म्हणजे शरिरातील कर्बद्वीप्राणिल वायूचे प्रमाण [ $CO_2$ ] झपाट्याने वाढते. दुसरे म्हणजे

रक्तातील प्राणवायूचे प्रमाण आणि स्नायुपेशीतील प्राणवायूचे प्रमाण यातील फरक खूप वाढतो.

(मर्यादित प्रमाणात) वाढलेल्या कर्बद्वी प्राणिल वायमुळे मेंदूमधील श्वासोच्छ्वास नियमित करणारे केंद्र उत्तेजित होते. यामुळ श्वसन दीर्घ पण वेगाने होऊ शकते. टेक्सास विद्यापीठाच्या डॉ. चॅपमन व मिटशेल यांच्या प्रयोगाप्रमाणे दर मिनिटाला आत घेणाऱ्या हवेचे प्रमाण आठ लीटरवरून शंभर लीटरपर्यंत वाढले जाते.

रक्तातील प्राणवायु आणि स्नायुपेशीतील प्राणवायू यांच्यातील तोल सांभाळण्यासाठी आपण दाराची उपमा घेऊ : स्नायुपेशीमध्ये भरपूर प्राणवायू असतो तेव्हा हे दार अगदी गरजेपुरते उघडले जाते, मात्र वेगवान पळण्यासारख्या भरपूर व्यायामाच्या वेळी स्नायुपेशीतील प्राणवायू जवळजवळ शून्यच असतो, त्यामुळे रक्तवाहिन्यातून येणारा सर्व प्राणवायू दार सताड उघडे ठेवून स्वीकारला जातो.

एवढ्यानेच कसं भागणार ? फुप्फुसाची वाढलेली क्षमता आणि प्राणवायू अधिक प्रमाणात वाहून नेणे आणि ऑक्सी हिमोग्लोबीनचे चटकन विघटन करून प्राणवायू पेशींना पुरवणे एवढेच पुरेसे नाही. कुठल्याही गोष्टीत हृदय ओतुन कार्य केल्याशिवाय विक्रमी होताच येत नाही. दर मिनिटाला सुमारे पाच लिटर रक्त शरिरात खेळवणारे आपले हृदय खेळाडू शेवटची रेषा ओलांडत असताना त्याच्या शरिरातून सुमारे २७ लीटर रक्त शरिराबाहेर फेकत असते. हे घडविण्यासाठी हृदयाची धडकन दुपटी तिपटीने वाढते. ती दर मिनिटाला सुमारे दोनशेपर्यंत वाढते. तर प्रत्येक स्पंदनातून (Beat) सत्तर मिलिलीटरऐवजी सुमारे एकशेवीस मिलिलीटर रक्त हृदयातून बाहेर पडते.

हृदयाची ही कार्यक्षमता खरोखरच अचाट आहे. पण तरीही स्नायुपेशींची प्राणवायूची तहानही भागेलच असे नाही. कारण हृदयामार्फत पुरविले जाणारे हे रक्त पोट, आतडी, मूत्रपिंड इत्यादी भागांना पुरविले जातेच, त्यामुळे कोणत्याही स्वरूपाची मदत खेळाडूला होत नाही. उलट तोटाच होतो. अर्थात यावरही प्रतिबंधक उपाय योजना करण्याचा शरीर आपल्याकडून प्रयत्न करतेच, त्यामुळे पायाच्या स्नायूंना सगळ्यात अधिक रक्तपुरवठा होतो. इतरांना रक्त पुरविणाऱ्या हृदयाला स्वतःचे पंपाचे काम नीट जोमदारपणे चालावे यासाठीही अधिक रक्ताची गरज असते. तीही पुरविली जाते. (तक्ता पहा.)

एवढे सगळे होऊनही खेळाडूचा एका मैलाच्या शर्यतीत ज्यावेळी शेवटचा फेरा चाललेला असतो त्यावेळी स्नायुपेशी त्यांना ऑक्सी हिमोग्लोबीनच्या विघटनाने मिळणाऱ्या प्राणवायुपेक्षाही अधिक प्राणवायू वापरत असतात. ही अशक्य वाटणारी गोष्ट शक्य होते याचे कारण स्नायुपेशी प्राणवायूचा साठा करू शकतात. या साठ्याचे नाव असते मायोग्लोबीन (Myoglobin) प्राणवायुवर याचे प्राणाएवढेच प्रेम असते. त्यामुळे स्नायुपेशीचे प्राण खरोखरच धोक्यात येतात. त्याच वेळी फक्त हा मायो-

ग्लोबीन आपले विघटन करून घेऊन हा प्रिय प्राणवायू स्नायूला पुरवतो. (व्हील सारखे प्रचंड प्राणी समुद्रात पाण्याखाली खूप वेळ राहू शकतात याचे एक कारण त्यांच्या शरिरात मायोग्लोबीनचा साठा खूप असतो हे आहे.)

उच्चांक निर्माण करताना क्रीडापटूच्या शरिरात होणारे बदल आणि त्याबरोबरच नकळत त्यावर पडणाऱ्या शारीरिक मर्यादा या अशा आहेत.

आपल्या सर्वांचीच शरिराची रचना व कार्यपद्धती थोड्या फार फरकाने सारखीच असते. पण तरीही आपण सारेच अजिक्य खेळाडू होऊ शकत नाही. असामान्य बुद्धिमत्ता, प्रतिभा हा दैवी देणगीचा वारसा असे आपण मानतो. विज्ञान त्याला Genetics ची करामत म्हणते. हे खेळाडूबाबतीतही खरे आहे. काहीजणांना भरपूर प्रमाणात त्याचा लाभ होतो. काही जण कमनशिबी असतात. बहुतेक इतर सर्व-सामान्य असतात. हा लाभ मिळाल्यावरही उत्कट इच्छा, भरपूर सराव, अचूक मार्ग-दर्शन, अनुकूल संधी आणि इतर अनेक गोष्टी येतातच. आजवर तरी शरीरशास्त्राची मर्यादा लक्षात घेऊनही ऑलिंपिकमध्ये नित्यनूतन विक्रमांची घोडदौड चालूच आहे. या विज्ञानाची आणि विक्रमाची कमान अशीच वाढती राहो अशीच इच्छा कोणीही रसिक वाचक करेल नाही का ?

## संगीत आणि मातृत्व

परमेश्वराने स्त्री जातीला अनेक शाप दिले आणि त्या साऱ्यांचा विसर पडावा म्हणून मातृत्वाचा मंगल वर दिला. बहुतेकांना हा मिळतो पण प्रत्येकीलाच मिळतो असे नाही.

स्त्री वयात आल्यानंतर स्त्री बीज (ovum) निर्माण करण्याची क्षमता तिच्यात येते. सुमारे पंचेचाळीस वर्षापर्यंत ती टिकून रहाते. ज्या स्त्रिया स्त्रीबीज निर्माण करू शकत नाहीत त्यांना अर्थातच मूल होण्याची शक्यताच रहात नाही. ही निर्मिती न करण्याची अनेक कारणे असतात, पण त्या सर्वामागे बहुधा एक मूळ कारण असते. आपल्या शरिरातील ज्या विशिष्ट ग्रंथींच्या (Endocrine) स्रावाद्वारे ही क्रिया नियमित होऊ शकते त्या स्रावांना हार्मोन (Hormone) म्हणतात. आणि बहुधा त्याचा संपूर्ण अभाव वा कमतरता यामुळे स्त्री जननक्षमतेसाठी अकार्यक्षम ठरते.

यावर निरनिराळे उपाय वैद्यकीय शास्त्र योजत आहे. शरिरात न निर्माण होणारी हार्मोन या ना त्या स्वरूपात योग्य प्रमाणात बाहेरून शरिराला मासिक पाळीच्या विशिष्ट दिवसात पुरवावयाची. असे याचे स्वरूप आहे. या पद्धतीने कमतरता काही वेळा भरून निघते खरी, पण काही वेळा या औषधाचे इतर परिणामही त्रासदायक ठरतात. अमेरिकेतील अलबर्ट वैद्यकीय महाविद्यालयतील डॉ. मेयर

यांनी केलेले याबाबतीतले प्रयोग अभूतपूर्व आहेत. योग्य प्रमाणात हार्मोन तयार व्हावेत आणि चालू नसलेले स्त्रीबीज निर्मितीचे कार्य पुन्हा चालू व्हावे यासाठी त्यांनी विशिष्ट प्रकारच्या संगीताचा उपयोग केला.

न्यूयॉर्कच्या अब्राहम हॉस्पिटलमध्ये या स्त्रियांना नादप्रतिबंधक (Sound proof) खोलीमधून ठेवण्यात आले. उपचार अत्यंत सोपा होता. त्या स्त्रियांच्या कानावर कृत्रिमरित्या तयार केलेले विशिष्ट प्रकारचे वेगवान, कान भेदून जाणाऱ्या ध्वनीच्या लहरी पडाव्यात अशी सोय करण्यात आली. हे आवाज दर नऊ मिनिटाला एक मिनिट याप्रमाणे काही वेळ ऐकविण्यात आले. या ध्वनींच्यामुळे स्त्रीबीज निर्माण करण्यासाठी आवश्यकता असलेले हार्मोन तयार करण्याचे कार्य शरिरात पुन्हा चालू झाले असे शास्त्रज्ञांनी सिद्ध केले. मात्र ही गोष्ट शरिरातील नेमक्या कोणत्या बदलामुळे घडून आली हे अजून शास्त्रज्ञ निश्चितपणे सांगू शकले नाहीत. या विषयाचा अभ्यास करणाऱ्या राष्ट्रीय समितीकडे डॉ. मेयर यांनी आपले निष्कर्ष नुकतेच सादर केले. कित्येक वर्षे मूल न झालेल्या आणि डॉक्टरांच्या मते ती शक्यताही नसलेल्या सात स्त्रियांच्यामध्ये या उपाययोजनेनंतर स्त्रीबीज निर्मितीस पुन्हा सुरुवात झाली. एक स्त्री तर गरोदर राहण्याएवढी सुदैवी ठरली.

अर्थातच हे सारे प्रयोग अजून प्राथमिक अवस्थेत आहेत हे डॉ. मेयर मान्य करतात. त्यामुळे प्रयोग केलेल्या स्त्रियांची संख्या ही एवढी कमी आहे. डॉक्टर-साहेबांच्या मते लवकरच व्यापक प्रमाणात या पद्धतीचे प्रयोग चालू होतील. आणि योग्य त्या प्रकारे ती विकसित झाल्यावर टेपरेकॉर्डरच्या साहाय्याने स्वतःच्या घरी डॉक्टर अथवा इस्पितळ यांच्या मदतीशिवाय सर्वसामान्य स्त्रीला ही उपाययोजना करून घेणे शक्य होईल.

## व्यायामाच्या वेळी शरिरातील इंद्रियांना होणारा रक्तपुरवठा.
### मिलिलिटर / मिनीट

| अवयव | विश्रांतीच्या वेळी | कमी व्यायाम | जास्त व्यायाम |
|---|---|---|---|
| मेंदू | ७५० | ७५० | ७५० |
| हृदय | २५० | ३५० | १००० |
| त्वचा | ५०० | १,५०० | ६०० |
| अन्नपचन संस्था | १,४०० | १,१०० | ३०० |
| स्नायू | १,२०० | ४,५०० | २२,००० |
| इतर | १७०० | १३०० | ३५० |
| एकूण | ५,८०० | ९५०० | २५,००० |

□ □ □



# मुरली लाहोटी

**इंप्रेशन पेंटिंग्ज**
**गंधर्व गॅलरी**

आपल्या शालेय जीवनापासून चित्रकलेचे वेड डोक्यात असलेला, आणि अनंत अडचणींना तोंड देऊन आपले ध्येय पुरे करणारा हा एक चित्रकार. घरचीं बरीच श्रीमंती असली तरी या वेडासाठी घरातील कोणतीही व्यक्ती आपल्याला सहाय्य करणार नाही, त्यासाठी आपली आपल्यालाच धडपड केली पाहिजे हे जाणून, मॅट्रीक पास झाल्याबरोबर घर सोडून बाहेर पडलेला हा चित्रकार.

ध्येयपूर्तीसाठी घर तर सोडलं, पण पुढे काय ! आता तर जवळ पैसा नाही असं असताना आपण जायचे कोठे ? पण मनाशी निश्चय केला की जवळ असलेल्या १० रु. वर नवीन जीवन सुरू करायचं. असं ठरवून लाहोटी आपले जन्मगाव परळी वैजनाथ सोडून पुण्याला आले. पुण्याला आल्यावर प्रथम त्यांनी आय्. टी. आय्. ला नाव दाखल केले. आणि शिक्षणाला सुरुवात केली. पण पोटाचा प्रश्न सुटेना. मग सरळ 'हिंदविजय' सिनेमाजवळ उभं राहून संध्याकाळच्या वेळी भेळ विकण्यास सुरुवात केली. दिवसा शिक्षण, आणि नंतर भेळ विकणे हा दिनक्रम सतत २ वर्षे करून आय्. टी. आय्. चा डिप्लोमा पूर्ण केला.

ह्या दोन वर्षात बराच अनुभव मिळाला. जवळ थोडा पैसा राहिला. नंतर 'अभिनव कला विद्यालय' येथे प्रवेश मिळवला. आणि पेन्टींगच्या पाच वर्षांच्या डिप्लोमाला सुरुवात केली. पुण्यातील नानापेठेत जे रामाचे देऊळ आहे तेथील ट्रस्टींना विचारून देवळात रहायला जागा मिळवली. काही दिवसांनी मिळालेल्या चित्रकलेच्या आणि पेन्टींगच्या आधारावर आपण काही करू शकू असा आत्मविश्वास श्री. लाहोटी यांना वाटू लागला. आणि त्याचा पडताळा पहावा म्हणून त्यांनी १९६६ मध्ये सदर देवळात आपल्या पेन्टींगचे एक छोटेसे प्रदर्शन भरवले. हिंमत धरून उचललेले हे पहिले पाऊल होते. ह्या प्रदर्शनात यश मिळाले तर राजस्थानच्या दौऱ्यावर जाण्याचा निश्चय केला होता. आणि त्यांच्या मनासारखे झाले. चार लोकांना लाहोटी नावाचा कोणी चित्रकार ह्या देवळात रहातो असे समजले. काही लोक येऊन लहान लहान पेन्टींग विकत घेऊ लागले. आणि आपले राजस्थान पहाण्याचं स्वप्न पुरे होणार अशी आशा लाहोटींना निर्माण झाली.

राजस्थानला जाण्यापुरता पैसा साठल्यावर त्यांनी आपली पावले त्या बाजूने टाकण्यास प्रारंभ केला आणि एक दिवस ते राजस्थानात जाऊन पोचले. पण तेथे परत पोटाचा प्रश्न आलाच. शिवाय कोणाची ओळख नाही. अशाच परिस्थितीत लाहोटींनी रस्त्यात बसून आपली चित्रकला लोकांच्यापुढे आणायची असा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे रस्त्यावर त्या लोकांच्या जीवनावर आधारित देखावे काढायला सुरुवात केली. त्यावेळेलाही दैवाने त्यांना चांगला हात दिला. चित्र पाहून लोक पैसे टाकत असत. कोणी आपली स्केचेस् करून घेत, तर काहीजण त्यांची चौकशी करून आग्रहाने आपल्या घरी जेवायला नेत असत. अशी रोज नवीन नवीन प्रदर्शने करून परत येण्याचा पैसा जमा केला.

१९६९ साली अभिनव कला विद्यालयाचा पेन्टींगचा डिप्लोमा दुसऱ्या नंबराने त्यांना मिळाला. ह्या पाच वर्षाच्या डिप्लोमाच्या काळात त्यांनी राजस्थानच्या यशानंतर जयपूर, बिकानेर, दिल्ली, मुंबई अशा प्रमुख शहरातून आपली वाटचाल चालू ठेवली होती. आणि प्रत्येक ठिकाणी ते एखाद्या तरी सुवर्णपदकाचे मानकरी होत होते. सर्वसाधारण तीन फुटापेक्षा मोठी असलेली त्यांची पेन्टींगज् एअर इंडिया, टाटा, जपानी कॉन्सुलेट, लंडन अॅम्बसी, यू. एस. ए. वगैरे प्रमुख ठिकाणी जात होती. भारतीय किर्तीचे कलाकार श्री. आचरेकर व श्री. रामानंद सागर यांनीही लोहोटींच्या कलेचा गौरव केला आहे.

असा हा चित्रकार आज कमर्शिअल आर्टच्या शेवटच्या वर्षाला शिकत आहे. आक्टोबरमध्ये त्यांच्या 'इंप्रेशन पेंटींग'चे प्रदर्शन पुण्यात गंधर्व आर्ट गॅलरीत भरणार आहे.

– सौ. मीना राय

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

१० ते १६ ऑक्टोबर १९७०

**मेष** : सप्ताहाला सुरुवात दशमातील चंद्राने होत आहे. यादिवशी घरात शुभ-समारंभ होईल. धनस्थिती चांगली सुधारेल. लग्नेश मंगळ सहाव्या घरात जात आहे. तो शत्रुनाश करील. पराक्रमाच्या गोष्टी घडण्याचा चांगला योग येईल. सरकारी कामात यश मिळेल. मानसिक अस्वस्थता वाढेल.

विद्याभ्यासात अडथळे निर्माण होतील. धंदाव्यवसाय चांगला चालेल. मेकॅनिक, फिरते एजंट, इमारती बांधणारे, जमिनीचे व्यवहार करणारे यांचे व्यवसाय उत्तम प्रगती करतील. संतती नीट वागणार नाही. भागिदारांकडून सर्व प्रकारे सहाय्य मिळेल. हट्टी स्वभाव व राग अनावर होईल. त्यावर बंधन घालावे.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे. ते मिश्रफलदायी आहे. मंगळवार-बुधवारी जरा गृहस्वास्थ्य बिघडेल. शुक्रवारी अचानक धनवंत व्हाल. दि. १०।११। १२।१६ हे दिवस नोंद करण्यासारखे.

**वृषभ** : शनिवारी सार्वजनिक कामाकरता प्रवासाचा योग येईल. त्यात चांगलेच नाव कमावले जाईल. धनस्थितीत अनपेक्षित सुधारणा होईल. बरेच दिवस अडून राहिलेली कामे द्रुत गतीने मार्गस्थ होतील. सरकारी कामात यश येईल. भागिदारांकडून सर्व अपेक्षा पूर्ण होतील. अन्य मार्गाने पैसा मिळण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात प्रगती होईल. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना व बौद्धिक व्यावसायिकांना अमाप धनलाभाचा व प्रसिद्धीचा योग आहे. सरकारकडून व सहकारी संस्थांकडून अनुदान मिळेल. स्वभावतःच या राशीची माणसे गोडबोली असतात. त्यातल्या त्यांत सर्व ग्रह शुभस्थानात आहेत. इंडिकेट गटाची जोरदार प्रगती होईल.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या घरांतून आहे. ते फारच छान आहे. सर्व आठवडाच यशदायक आहे.

**मिथुन** : शनिवारी अचानक मोठे खर्च निर्माण होतील. एकंदर धनस्थिती अस्थिर राहील. घरासंबंधी अडलेली कामे मार्गस्थ होतील. भाऊबंदकीत मानहानी होईल. भागिदार व संतती सर्व तऱ्हेची मदत करतील. त्रिकोणातील गुरु-शुक्र युती सर्वबाबतीत परिस्थिती सुधारतील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होईल. साहित्यिक, प्रकाशक चित्रकार, नाट्य-कलाकार या सर्वांना उत्कर्षदायक ग्रह आहेत. हातात जे काम घेतील त्यात यश येईल. हे सर्व वैयक्तिक व्यवहारात घडून येईल. ही राशी devalued गट ची असल्यामुळे सार्वजनिक कामात अपयश येईल. मित्रांकडून अचानक धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. मंगळवार-

बुधवारी उद्योगधंद्यात चांगलीच धनप्राप्ती होईल. रविवार-सोमवार मानसिक यातना फार होतील. शुभ तारखा १३।१४।१५।१६.

कर्क : शनिवारी सासुरवाडीला काही समारंभाकरता जावे लागेल. धनस्थिती आठवडाभर चांगली राहील. भावंडांची मदत प्रत्येक कामात होईल. जागा-जमीन खरेदी करण्याचे बेत सिद्धीस जातील. दिवस आनंदात आणि सुखात जातील. रविवारी व सोमवारी जरा मानसिक यातना होतील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. संततीचा उत्कर्ष होण्यामुळे सुखवृद्धी होईल. कलाकारांना आठवडा भरघोस पैसा मिळवून देईल. मंगळवार-बुधवार सरकारी कामाला फार चांगले आहेत.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानातून आहे. ते मिश्रफल देणारे आहे. गुरुवारी-शुक्रवारी घरातील वडील माणसे आजारी पडण्याचा बराच संभव आहे. केंद्रातील गुरु-शुक्र सर्व संकटे दूर करतील शुभ तारखा १२।१३।१४।१५।१६.

सिंह : जमिनीच्या अगर घराच्या व्यवहारात गडगंज पैसा मिळण्याचा योग, या आठवड्यात आहे. हा योग मंगळवारी-बुधवारी जास्त जोरदार आहे. मित्राकडे बरेच दिवस अडकून पडलेली मोठी रक्कम अचानक हातात येईल. परदेशगमनाची इच्छा लवकरच पुरी होण्याची संधी मिळेल. संततीकडून भरपूर धनलाभ होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश मिळेल. विद्येच्या जोरावर मानमान्यता मिळेल. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना स्थिर स्वरूपाच्या योजना सुचतील व त्या कार्यवाहीत सुलभ-रीतीने आणता येतील. वडील माणसांच्या मदतीने व्यवसायधंदा स्थिर करता येईल. आध्यात्मिक विचार मनाला शांतता देतील.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. रविवारी-सोमवारी मनाची शांतता जराशी कमी होईल. भागिदार अगर पत्नी मनाविरुद्ध वागतील. अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा १०।१३।१४।१५।१६.

कन्या : आठवड्याची सुरुवात भरघोस धनलाभ घडवून आणणारी आहे. धनस्थिती चांगली राहील. सर्व मार्गांनी पैसा हातात येत राहील. भावंडांची मदत प्रत्येक बाबतीत होईल. प्रवासात जाता जाता केलेल्या एखाद्या व्यवहारात चांगल्या व्यक्तीची गाठ पडून कायम स्वरूपाचा फायदा होईल. विद्याभ्यासात अर्धवट यश मिळेल. संततीकडून त्रासदायक वागणूक होईल. मेकॅनिकल अगर रसायनांचा अभ्यास करणाऱ्यांना त्यातल्या त्यात जरा बरे दिवस आहेत. घरी पत्नीकडील पाव्हणे येऊन मंगळवार-बुधवार आनंदात जातील. सरकारी कामात यशःप्राप्ती होईल. वडिलार्जित स्थावर मिळकतीबद्दलचे प्रश्न सुलभ रीतीने सुटतील.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शत्रूनाश होईल. रवि-चंद्राना ६।८।१२ या स्थानांचा दोष नसतो. गुरुवार-शुक्रवारी अचानक धन-लाभाला चांगले आहेत. वडील मुलाच्या अगर वडील भावाच्या नावावर लॉटरी तिकिट घ्यावे. यश येईल. सर्व आठवडा शुभफलदायी आहे.

तूळ : शनिवारी घरात काहीतरी शुभ समारंभ होण्याचा योग आहे. धनस्थिती

चांगली राहण्याचा संभव कमी. बराचसा पैसा भागिदारीच्या धंद्यात अडकून पडेल. मित्रांकडील व सरकारातून येणारी रक्कम योग्य वेळात मिळणे अवघड होईल

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होणे फारच असंभवनीय आहे. संतती व पत्नी अनेक प्रकारचे खर्च करतील. ट्रान्सपोर्टचे अगर खाणीचे व्यवसाय करणाऱ्या संस्थांना भरपूर काम मिळण्याचा शुभयोग आहे. त्यात त्यांचा फायदाच होईल. साहित्यिकांचे हातून चांगले लिखाण होईल.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ते शुभ फलदायी आहे. रविवारी-सोमवारी मनाविरुद्ध गोष्टी घडण्याचा दाट संभव आहे. मातुल घराण्याकडून सर्व तऱ्हेची मदत होण्याचा चांगलाच योग आहे. भागिदार गुरुवारी-शुक्रवारी प्रत्येक बाबतीत मदत करतील. फार मोठ्या अडचणीतून लग्नातील गुरू-शुक्र सोडवणूक करतील. शुभ तारखा १०।१३।१४।१५।१६

वृश्चिक : शनिवारी प्रवासाचा योग येईल. एकाद्या नवीन जागाजमिनीबद्दल सौदा करण्याकरता बाहेरगावी जावे लागेल. सार्वजनिक कामात भाग घेण्याचा योग या आठवड्यात आहे. दि. १५–१६ ला खर्चाची प्रकरणे निर्माण होतील.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होणे जड जाईल. भावंडे व संतती दोहोंकडून फार त्रासदायक, मनाविरुद्ध वागणूक होण्याचा दाट संभव आहे. विनोदी व हलके साहित्य लेखकांना प्रगतीकारक दिवस आहेत. सरकारकडून खूप मदत होईल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना हा योग जास्त प्रमाणात अनुभवाला येईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या घरातून आहे. ते फारच चांगले आहे. बुधवार-गुरुवारी अचानक धनलाभाचा योग आहे. अकराव्या स्थानातील रवी-मंगळ-बुधाची उपस्थिती हा योग घडवून आणील. व्ययातील गुरू-शुक्र गुरूवार-शुक्रवारी मोठेपणा सांभाळण्याकरता खर्च करणे भाग पाडतील. शुभ तारखा १०।१३।१५।१६.

धन : शनिवारी अचानक धनलाभाचा योग आहे. रविवार-सोमवार पराक्रमाला व्यवसायाला फारच चांगले आहेत. दशमस्थानातील रवी-मंगळ-बुध व ११ व्या स्थानातील गुरु-शुक्र उद्योगधंद्यात अचानक मनाजोगी वाढ करण्याला मदत करतील. पैशाची परिस्थिती अत्यंत मनाजोगी राहील.

विद्येत भरघोस यशःप्राप्ती होईल. विवाहाबद्दल गुरुवार-शुक्रवारी चर्चा होईल. प्रत्यक्ष घटना घडण्याला थोडा वेळ आहे. कलाकारांना विशेषकरून, चित्रकार साहित्यिकांना दिवस प्रगतीपर आहेत. त्यांच्या प्रत्येक कृतीचे समाजाकडून कौतुक केले जाईल. सरकारकडून अनुदान मिळविण्याच्या प्रयत्नांना यशःप्राप्ती होईल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातून आहे. ते अत्यंत शुभदायी आहे. रविवारी सोमवारी भावंडांशी तीव्र मतभेद होण्याचा दाट संभव आहे. मन उदास होईल. धाडसाच्या कामात पाय टाकण्याला दिवस चांगले आहेत. घराबद्दल प्रयत्न सुरू केल्यास डिसेंबर ११ नंतर स्वतःचे घर करण्याच्या प्रयत्नाला यश येऊ लागेल. सर्व आठवडाच शुभफलदायी आहे.

शनिवारी माहेरी गेलेली पत्नी परत आली नसल्यास जरूर परत येईल. व्यवसायातील भागीदार विशेष करून प्रकाशनाच्या धंद्यातील काहीतरी मोठी योजना मांडतील. ती कार्यवाहीत आणण्याला दिवस चांगले आहेत. जरूर असलेले कर्ज थोडक्या श्रमात रविवार-सोमवारी मिळेल फक्त वाणी गोड ठेवली पाहिजे.

विद्येत बौद्धिक व्यवसायात भरपूर यश येईल. घरातील मंडळींकडून या बाबतीत चांगलीच मदत होईल. संततीचा भाग्योदय होईल. नोकरीत वरची जागा मिळेल. निमसरकारी काम करणाऱ्या व्यक्तींच्या हातून समाजहितकारक मोठे कार्य होण्याचा योग आहे. उद्धटपणा कमी न केल्यास नुकसान आहे.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या घरातून आहे. ते फारच चांगले आहे. गुरूवार-शुक्रवारी पाव्हण्यांनी घर गजबजून जाईल. आनंदी आनंद भरून राहील. घरात काहीतरी लग्नासारखी शुभ कार्ये जमतील. शुभ तारखा १०।१३।१४।१५।१६

**कुंभ :** आठवड्याच्या सुरुवातीपासूनच धनस्थिती सुधारण्याच्या मार्गावर राहील. हट्टीपणा आवरला पाहिजे. अष्टमातील रवी-बुध-मंगळ सर्व बाबतीत अपयश आणण्याचा जोरदार प्रयत्न करतील. सरकार, मित्र, संतती सर्व उलटतील. याला कारण स्वतःचा माथेफिरूपणा. विद्याभ्यासातील प्रगतीला विरोधी ग्रहस्थिती आहे. फक्त अध्यात्मिक विचार प्रसृत करण्याचे काम यशस्वी होईल. धंदाव्यवसाय धोक्यात येण्याचा संभव आहे. मानमान्यतेला व पराक्रमाला कमीपणा येईल. अचानक धनलाभ होण्याचा योग मंगळवारी-बुधवारी आहे. या दिवशी लॉटरी तिकीट घ्यावे. संततीचा उत्कर्ष होणे लांबणीवर पडेल.

चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. रविवार-सोमवारी शत्रूंकडूनसुद्धा मदत होण्याचा योग आहे. राजकारणातील व्यक्तींचे डावपेच थोडेफार यशस्वी होतील. राशी सिंडिकेटची आहे. त्यामुळे शेवटपर्यंत यश मिळणे कठीण जाईल. गुरुवारी-शुक्रवारी भाग्यातील गुरु-शुक्रांच्या उपस्थितीने सर्व अडचणी दूर होतील. शुभ तारखा १३।१४।१५।१६.

**मीन :** सुरुवातीपासून आठवडा पैशाच्या बाबतीत अडचणी निर्माण करणारा आहे. स्थावर-मालमत्तेवर कर्ज काढावे लागेल. मानमान्यता व पराक्रमाला कमीपणा येईल. मित्र परिवार तुटकपणानी वागेल. सच्च्या प्रयत्नाला सुद्धा यश मिळणे जड जाईल. मंगळवार-बुधवारी अत्यंत मानसिक त्रास भोगावा लागेल.

विद्याभ्यासात व बौद्धिक व्यवसायात काहीही न करता स्वस्थ बसणे अधिक फायदेशीर पडेल. घरातील व्यक्तींकडून पूर्ण सहानुभूती मिळेल. भागिदार व पत्नी चांगलेच उपयोगी पडतील. रविवार-सोमवारी मानसिक यातना व व्यवसायात नुकसान होण्याचा दाट संभव आहे. जपून वागणे अधिक उपयोगी पडेल.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे. ते मिश्र फलदायी आहे. सप्तमातील रवि-बुध-मंगळ शेवटी प्रत्येक अडचणीची सोडवणूक करतील व अगदी शेवटच्या घटकेला मानहानी होऊ देणार नाहीत. गुरुवार-शुक्रवारी अचानक परिस्थिती सुधारेल व सर्व काही ठाकठीक होईल. शुभ तारखा १०।१५।१६. ◻ ◻ ◻

पृष्ठ ८ वरून

घोड्यांप्रमाणे गोल गोल फिरून पुन्हा त्याच जागी येईल.'

शिवसेनेला अजूनपर्यंत अधिकृतरीत्या कोणीच पाठिंबा दिलेला नाही. संघटना काँग्रेसच्या मुंबई प्रदेश समितीचे कोणी सदस्य श्री. नीळकंठ सामंत यांनी 'कम्युनिस्ट उमेदवार निवडून आल्यास तो लोकशाहीच्या थडग्यावरील खिळा ठरेल, तेव्हा सर्व मतभेद बाजूला सारून लोकशाहीवाद्यांनी कम्युनिस्टांचा पाडाव करण्याकरता शिवसेनेविषयीचा मत्सर बाजूला ठेवावा' असं पत्रक काढल्याची एक बातमी वाचली म्हणून मी मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष श्री. हफिझखा यांना भेटून त्यांची यासंबंधी भूमिका काय असा प्रश्न विचारला. त्यांनी सांगितले, 'आम्ही या निवडणुकीत तटस्थ रहाणार आहोत, आम्हाला जर तेथे लुडबूड करायची असती तर आम्ही कोणाला पाठिंबा देण्याऐवजी स्वतःच निवडणूक लढविली असती.' त्याचप्रमाणे श्री. नीळकंठ सामंत नावाची कोणी व्यक्ती बी. पी. सी. सी. (संघटना)त आहे की नाही हे त्यांना माहीत नसल्याचं त्यांनी सांगितलं.

जनसंघ शिवसेनेला पाठिंबा देणार असल्याची खास गोटातील बातमी वर्तमानपत्रांतून आली आहे. कारण त्यांच्यामते हा 'राष्ट्रवादी' व 'देशद्रोही' यांच्यातील लढा आहे.

ही निवडणूक लढविण्याबाबतची शिवसेना आणि साम्यवादी पक्ष यांची भूमिका काय? तर शिवसेनेला असं वाटतं की साम्यवाद्यांचा विचार हा देशविघातक आहे. ही निवडणूक शिवसेना सूडबुद्धीनं लढवित असल्याचा सेनेचा दावा आहे. आज बंगाल व इतर प्रांतात जे घडत आहे त्यामुळे 'स्वातंत्र्याच्या नरडीलाच नख लावलं जाण्याची' परिस्थिती निर्माण झाली आहे म्हणूनच 'हे विष' मुंबई व महाराष्ट्रात त्यांना रुजू द्यायचं नाही. डांगे लाल बावटा या देशावर फडकविण्याची व लोकशाहीला मूठमाती देण्याची भाषा बोलत आहेत. तो विचार त्यांना मोडून काढायचा आहे. ६८ सालचा कौल शिवसेनेच्या बाजूनं लागल्यानं यावेळच्या यशाचीही त्यांना ठाम खात्री वाटते. लोणे, पावसकर आदी मंडळींच्या काँग्रेस प्रवेशाचा निवडणुकीवर काडीचाही परिणाम होणार नाही, कारण मतदार सूज्ञ आहेत असं शिवसेनेचे नेते सांगतात. साम्यवादी पक्ष ही निवडणूक भावनेचं जबरदस्त भांडवल करून लढवित असल्याचा शिवसेनेचा त्यांच्यावर आरोप आहे. हा लढा त्यांना राष्ट्रप्रेमी लोकशाहीवादी विरुद्ध देशद्रोही अशा दोन प्रवृत्तींमध्ये असल्याचं वाटतं. म्हणूनच श्री. ठाकरे सभांमधून सांगतात, 'हा विळा तुमची मान कणसाप्रमाणे कापील, राज्य भगव्या झेंड्याचं की लाल बावट्याचं हे मतदार बंधु, भगिनी, मातांनो तुम्ही ठरवायचं आहे. त्याचप्रमाणे मराठी माणसाच्या प्रश्नांना वाचा फोडायची असेल तर विधान-

सभेत शिवसेना असणे आवश्यक आहे, आवश्यक आहे. आम्ही कोणाचाही भावनात्मक पाठिंबा न घेता एकटयाच्या ताकदीवर निवडणूक लढवित आहोत.'

शिवसेनेचे एक नेते श्री. दत्ताजी साळवी यांना मी विचारले, 'ही निवडणूक म्हणजे ७२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीची रंगीत तालीम समजायची काय?' त्यावर ते म्हणाले, '६८ सालच्या महानगरपालिकेच्या निवडणुका ही खरी रंगीत तालीम होती. तेथे आम्ही फिट ठरलो. आज आम्ही मुंबईतून विधानसभेवर आमचा प्रनिनिधी पाठवित आहोत. ७२ साली साऱ्या महाराष्ट्रातून आमचे प्रतिनिधी जातील.'

साम्यवादी पक्षाच्या दळवी बिल्डिंगमधील कचेरीत कॉ. एस्. एल्. कारखानीस यांना भेटलो. त्यांची ही निवडणूक लढविण्यामागची भूमिका अर्थातच अशी: पूर्वीची ही जागा त्यांच्या पक्षाची. कामगार विभाग हा 'त्यांचा' विभाग आणि 'शिवसेनेच्या फॅसिस्ट प्रवृतीशी लोकशाहीवादी पक्षांनी लढा दिलाच पाहिजे.' कृष्णा देसाई यांचा खून होण्यापूर्वी जवळजवळ सहा महिने अगोदरच परिस्थितीत बदल होत होते आणि शिवसेनेविरुद्ध डावे पक्ष एकत्र येत होते. खुनामुळे या प्रोसेसला अधिक गती मिळाली. शिवाय किमान कार्यक्रमावर भर देऊन सर्व डाव्या पक्षांची एकजूट झाली. जनतेचाही उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. त्यामुळे ही निवडणूक लढविण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

श्रीमती देसाईंना उभं करण्यामागे भावनात्मक पार्श्वभूमी तयार करण्याचा साम्यवादी पक्षाचा प्रयत्न आहे काय, त्याचप्रमाणे श्रीमती देसाई यांच्यापेक्षा अधिक योग्य उमेदवार त्यांच्या पक्षाकडे नाही काय ह्या माझ्या प्रश्नावर ते म्हणाले की त्यामागे भावना असल्याचं ते नाकारीत नाहीत. पण फक्त तेवढाचं हा भाग नसून श्रीमती देसाईंची उमेदवारी (कृष्णा देसाईंची पत्नी म्हणून) इतर पक्षांना चटकन मान्य होण्यासारखी होती. त्याहीपेक्षा श्रीमती देसाई या पक्षसदस्य असून गेली पाच सहा वर्षे पक्षाच्या महिला आघाडीच्या धडाडीच्या कार्यकर्त्या असल्यानंही त्यांची उमेदवारी पक्षानं मान्य केली. त्या विभागातील अनेक लोकांचा व पक्ष कार्यकर्त्यांचा उत्साहही या वेळी दांडगा आहे असं त्यांना वाटतं. गेली दोन वर्षे काही ठिकाणी साम्यवाद्यांना पाठिंबा कमी होता, व जेथे बहुतेक मंडळी शिवसेनेकडे होती तेथेही त्यांना आता चांगलाच पाठिंबा मिळू लागला आहे. शिवाय केरळ-बंगालातील संयुक्त आघाडयांच्या कारभारांमुळे लोकांच्या अपेक्षा भंगल्या होत्या. पण केरळच्या निवडणुकीनंतरचं वातावरण बदललं असल्यानं व लोणे आदिप्रभृतींच्या शिवसेना त्यागामुळे फायदा श्रीमती सरोजिनी देसाई यांना होईल व त्या विजयी होतीलच असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साम्यवादी, श्रीमती देसाईंच्या उमेदवारीबाबत इतर कितीही आशावादी असले तरी एक गोष्ट कॉ. कारखानीस व साम्यवादी पक्षाला पाठिंबा देणाऱ्या इतर काही डाव्या पक्ष-

नेत्यांनी मजजवळ कबूल केली, की यात भावनात्मकतेचा फार मोठा भाग आहे. (हेच साम्यवादी कै. पंजाबराव देशमुख व कै. मा. स. कन्नमवार त्याचप्रमाणे कै. बर्वे यांच्या मृत्यूनंतर पहिल्या दोघांच्या पत्नींनी व कै. बर्वे यांच्या भगिनीने त्या मतदार संघातून भावनात्मक पार्श्वभूमीवर निवडणूक लढविण्याच्या कल्पनेची टिंगल करत होते ! )जसं काही कृष्णा देसाई पुन्हा निवडणूक लढवित आहेत असं वाटण्याइतक्या 'कृष्णा देसाई अमर रहे'च्या घोषणा भिंतीवर रंगविल्या गेल्या आहेत.

शिवसेनेचा प्रचार एकंदरीनं अत्यंत तडाखेबंद रीतीने चालू आहे. ३२ दिवसात ३० सभा घेण्याचा त्यांनी संकल्प केला असून तो धूमधडाक्यानं चालू झाला असून सेनेचे नेते रोज निरनिराळ्या ठिकाणी सभा घेत आहेत. शिवसेनेच्या एका सभेला मी उपस्थित राहू शकलो होतो. हिंदमाता लेनमधील त्या लांबलचक गल्लीतील रात्रीच्या सभेला पाच ते सहा हजार मंडळी सहज उपस्थित असतील. सभाही अत्यंत शांतपणे व शिस्तबद्ध रीतीने पार पडली. विशेष म्हणजे सभेनंतर झालेल्या राष्ट्रगीताच्या वेळीही वाखाणण्याजोगी शिस्त होती. राजकीय पक्षांनी गल्लीबोळातून घेतलेल्या सभांच्या इतिहासात कदाचित हा आगळा भाग ठरू शकेल. शिवसेनेमागे भारल्या गेलेल्या तरुणांचा फार मोठा संचही अत्यंत उत्साहानं व मेहनतीनं काम करीत असल्याचं दृश्य त्या भागातून फिरत असताना सहजपणे आपल्या नजरेस पडतं. शिधरे गुरुजींचं दुकान हे त्यांच्या प्रचाराचं एक महत्त्वाचं केंद्र, तेथे तर धावपाळीचं वातावरण अगदी बसमधून जाता येताही दिसतं, तर साम्यवादी पक्षाच्या दळवी बिल्डींगमधील कचेरीत तरुण मंडळी मला अभावानेच आढळली. खरं म्हणजे मी तिथे गेलो होतो त्यावेळी निवडणूक प्रचाराच्या संदर्भात कार्यकर्त्यांची एक बैठक होती, पण सर्वच चेहरे चाळीशीच्या पुढील होते. अर्थातच साम्यवादीही, तरुणांचा फार मोठा वर्ग शिवसेनेकडे आकर्षिला गेला असल्याचं मान्य करतात.

माझा स्वतःचा असा अनुभव आहे की अनेक सुशिक्षित मंडळींपेक्षा गिरणगावातील आपले कामगारबंधू अधिक जागरूक आहेत. म्हणून त्या भागातील मतदारांचा कल कोणीकडे आहे हे अजमावण्यासाठी मी काही चाळीतून फिरलो. वेगवेगळ्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. जुनाट मोडकळीस आलेल्या अनेक चाळी व त्यात रहाणारे गरीब कामगारबंधू कोणता पक्ष किती कार्य करतो हे चाणाक्षपणे हेरू शकतात. अशाच एका चाळीतील एक गृहस्थ मला सांगत होते, 'तुम्ही वर येत असताना आमच्या चाळीची चाललेली दुरुस्ती पाहिली असेल. आज अनेक वर्षं आमची चाळ मोडकळीस आली आहे. प्रथम कोणीही लक्षच दिले नाही, पण नंतर कॉंग्रेसचे श्री. गजानन लोके यांनी प्रयत्न केले पण तरीही काम होऊ शकलं नाही. त्यानंतर शिवसेनेचे नगरसेवक साटमगुरुजी यांनी आमच्या चाळीचा प्रश्न हाती घेतला आणि सतत त्यामागे राहून आज ही दुरुस्ती चालू झाली आहे. शिवसेनेनं येथे कार्य केलं आहे. आमच्या चाळीतील दोन खोल्या कॉंग्रेसवाल्यांच्या आहेत त्या सोडून आमची साऱ्यांची मतं शिवसेनेला.' बसच्या

रांगेत उभा असलेला मिलमध्ये कामाला निघालेला एक तरुण कामगार म्हणाला, ' देशद्रोही कम्युनिष्टांना मी मत देणार नाही. '

एका इमारतीवर शिवसेनेचे ध्वज होते म्हणून शिरलो तेथे. दुसऱ्या मजल्यावर गॅलरीत उभ्या असलेल्या एका गृहस्थाशी ओळख काढून त्याच्याशी बोलू लागलो. हळूहळू विषयाला हात घातला. मला वाटलं ते गृहस्थ असावेत श्री. वामनराव महाडिकांना मतं देणारे. पण प्रत्यक्षात त्यांचा पक्ष निघाला नवकाँग्रेस. ते म्हणाले, ' दडपशाहीने शिवसेना आमची मते मिळवू शकणार नाही. पण मी कम्युनिष्टांनाही मत देणार नाही. दोन्ही पक्ष मत न देण्याच्या लायकीचे आहेत. '

तावरीपाड्याजवळील (कै. कृष्णा देसाईंचं निवासस्थान तावरीपाडा येथे आहे.) का मारतीवर सर्वत्र विळ्या कणिसाचे लाल ध्वज होते आणि अपेक्षेप्रमाणे मंडळी निघालीही ' सहप्रवासी '. त्यांना अर्थातच शिवसेनेची ' फॅसिस्ट प्रवृत्ती ठेचली जावी ' असं वाटतं होतं. शिवसेना उमेदवाराचा पराजय करण्यानेच कृष्णा देसाई यांच्या खुनाचा थोडा फार बदला घेतला गेल्याचं समाधान मिळेल असं त्या इमारतीबाहेर रस्त्यावर उभ्या असलेल्या एक मध्यम वयाच्या माणसानं मला सांगितलं. काँग्रेसकडे कल असलेला एक गृहस्थ श्रीमती सरोजिनी देसाई यांना मत देणार असल्याचं त्यांनी मला सांगितलं. पण त्याबरोबर मी असा प्रश्न विचारणं अयोग्य असल्याचंही तो मला म्हणाला. कारण मतदान गुप्त रीतीने करायचं असतं ना ?

विजयश्री कोणाच्या गळ्यात माळ घालणार हे आक्टोबरची १८ तारीखच ठरविल. पण मतदारसंघात फिरल्यानंतर, अनेक लोकांशी बोलल्यानंतर खूपशा लोकांचा कल शिवसेनेकडे असावा असं दिसतंय. शिवसेनेने निरनिराळ्या प्रकारे वातावरणही शिवसेनामय करण्यात यश मिळविलं आहे. अर्थातच काही विचाराबरोबरच (म्हणजे राष्ट्रवाद-राष्ट्रद्रोह) दोन्ही बाजूला भावनेचाही भाग आहे. एक भावना आहे कृष्णा देसाईंचा खून तर दुसरी आहे मराठी माणसांच्या प्रश्नांना वाचा फोडणे. या निवडणुकीत शिवसेना विजयी झाली तर या निवडणुकीसाठी एकत्र आलेल्या सर्व डाव्या पक्षांना बसणारा हादरा प्रचंड असेल. त्यावरून ७२ सालची तयारी त्यांना व इतरांनाही करावी लागेल. थोड्याच दिवसांनी येत आहे १८ आक्टोबर.

¤ ¤ ¤

---

## मतदार संघ—

काळा चौकीपासून सुरू होणाऱ्या या मतदारसंघात, आंबेवाडी, परळ व्हिलेज, परळ नाका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, चिंचपोकळीचा काही भाग येतो. निवडणुकीच्या दिवशी एकूण ९७ मतदान केंद्रे असतील. त्यापैकी २५ खास मंडप मतदान केंद्रे म्हणून उभारण्यात येणार आहेत.

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649

# टिळक स्मृती : चिखलगाव

लोकमान्य टिळकांच्या अनेक स्मृती दापोली तालुक्यातील चिखलगाव या लहानशा गावात वैराण अवस्थेत पडून आहेत. त्यामध्ये त्यांच्या पूर्वजांचे श्री. केशवराज मंदिर व मूळ घराचा चौथरा अद्यापही तग धरून आहे. त्यांच्या स्मृतीचे जतन आणि चिंतन व्हावे म्हणून १ ऑगस्ट १९७० रोजी दापोली येथे एका समितीची स्थापना झाली. या समितीतर्फे आता पुढीलप्रमाणे योजना आखण्यात आली आहे.

१: श्री. केशवराज मंदिर : सदरहू देवळाच्या जीर्णोद्धारासाठी सुमारे पाच हजार रुपये खर्च येईल. या मंडपाचा वापर गावचे मंदिर म्हणून (समाज मंदिर) करण्यास टिळक कुटुंबियांचा विरोध नाही, ते त्यांनी गावाला अर्पण केले आहे.

२ : घराचा चौथरा : चिखलगावच्या जुन्या ब्राह्मणवाडीत टिळकांच्या घराचा चौथरा आहे. त्याची डागडुजी करून तेथे कंपाऊंड उभारणे व शक्य असल्यास तेथे टिळकांचा पुतळा व स्मृतिशिला बसविणे. या कामी खर्च सुमारे रु. दोन हजार.

३ : दवाखाना : या लहानशा गावात व पंचक्रोशीत कोणतीही वैद्यकीय सोय उपलब्ध नाही. लहानशा प्रमाणात गावात दवाखाना चालू करण्याचा विचार आहे. या आडगावी जाऊन विना मोबदला काम करण्याचे दाभोळ येथील प्रसिद्ध डॉक्टर श्री. चंद्रकांत मोकल यांनी मान्य केले आहे. आठवड्यातून एक वेळ ते जातील. १५ ऑक्टोबरचे दरम्यान हा दवाखाना चालू होईल. रुग्णांसाठी औषधांची गरज लागणार आहे. या कामी जिल्हा परिषद, औषधी कंपन्या यांनी औषधे व संबंधी साधनांचा पुरवठा केला तर पंचक्रोशीलाही मोठा फायदा होईल.

४ : दाभोळ-दापोली रस्त्याच्या मध्यभागापासून सुमारे एक मैल आत चिखलगाव आहे. ते हमरस्त्यावर यावे यासाठी जि. प. व शासनाकडे प्रयत्न चालू झाले आहेत. या सर्व कामासाठी किमान दहा हजार रुपयांचा निधी जमा करण्याचा समितीचा संकल्प आहे. या निधीसाठी युनियन बँक ऑफ इंडियाच्या दाभोळ शाखेमध्ये खाते उघडण्यात येत आहे. रकमेची पोच वैयक्तिक पावतीद्वारे देण्यात येईल.

आपली देणगी श्री. अण्णा शिरगावकर, कोषाध्यक्ष, दापोली तालुका टिळक स्मृती समिती, मु. पो. दाभोळ, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी या पत्त्यावर पाठवावी.

**समिती –**

श्री. प्र. ग. रेळेकर, B.Sc. अध्यक्ष. अण्णा शिरगावकर, उपसभापती, दा. ता. पं. समिती. रतनलाल भंडारी, चिटणीस. सदस्य : काळूरामशेठ माळू, ऑ. मॅजिस्ट्रेट. सौ. शैलजा गंगाधर मंडलीक, जि. प. सभासद. हनुमंत बाबू आदवडे, सरपंच, ग्रा. पं. चिखलगाव. विनायकराव टिळक, पोलीसपाटील, चिखलगाव. राजाभाऊ विवलकर, सरपंच, ग्रा. पं. आसूद. मदन संभाजी भाटकर, सरपंच, करजगाव. श्रीपाद नारायण महाजन, दापोली. डॉ. द. भा. मनोहर, दाभोळ. डॉ. श्री. गो. महाजन, कोळथरे.